दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com
• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६७ | शनिवार दि.२४ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आत्मपरीक्षणाचा आरसा...

राजकारणात सत्तेची स्पर्धा, संख्याबळाची गणिते आणि संधिसाधूपणाचे व्यवहार इतके वाढले आहेत की, मूल्यनिष्ठ राजकारण दुर्मीळ होत चालले आहे. अशा काळात भाजपचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेचे सदस्य संदीप जोशी यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेण्याची घोषणा करणे, ही केवळ एका नेत्याची वैयक्तिक माघार नसून, आजच्या राजकीय संस्कृतीवर मारलेली तीव्र टिप्पणी आहे.

# कापूस भाववाढीचा फायदा व्यापाऱ्यांना; शेतकरी मात्र वंचितच!

## शेतकऱ्यांकडील कापूस संपल्यानंतर दरात सुधारणा

पुणे । प्रतिनिधी

**कापूस उत्पादनातील मोठी घट, बाजारात घटलेली आवक, जागतिक पातळीवरील घडामोडी आणि कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून सुरू झालेली कापूस विक्री या सर्व कारणांमुळे कापसाच्या दरात अलीकडच्या काही दिवसांत लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र ही दरवाढ शेतकऱ्यांच्या हातून कापूस गेल्यानंतर झाल्याने, प्रत्यक्ष फायदा व्यापाऱ्यांनाच झाला असून शेतकरी मात्र पुन्हा एकदा वंचित राहिले आहेत.**

हंगामाच्या सुरुवातीपासून मागील काही दिवसांपर्यंत कापसाचे बाजारभाव साडेसहा ते सात हजार रुपये प्रति क्विंटल दरम्यान स्थिर होते. त्यानंतर अचानक दरात उसळी येत सध्या कापूस आठ हजार १०० ते आठ हजार चारशे रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचला आहे. मात्र तोपर्यंत बहुतांश शेतकऱ्यांनी आपला कापूस कमी दरात विकलेला असल्याने दरवाढीचा लाभ त्यांना मिळालेला नाही. यंदा खरीप हंगामात कापसाच्या लागवड



क्षेत्रात मोठी घट झाली. याशिवाय यंदा अतिवृष्टीचा मोठा फटका बसल्याने उत्पादनावर परिणाम झाला. वेचणीसाठी मजूरटंचाईसह अनेक अडचणी शेतकऱ्यांना सहन कराव्या लागल्या. मागील वर्षी तीन वेचण्यांपर्यंत कापूस मिळत असताना, यंदा केवळ एका वेचणीतच बहुतांश उत्पादन संपले. केंद्र सरकारने मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७ हजार ७१० रुपये आणि लांब धाग्याच्या कापसासाठी ८ हजार १०० रुपये प्रति क्विंटल असा हमीभाव जाहीर केला होता. मात्र प्रत्यक्षात हमीभाव खरेदी केंद्रे उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांकडे कापूस विक्री करावी लागली. त्या वेळी व्यापाऱ्यांनी साडेसहा ते सात हजार रुपये प्रति क्विंटल दराने कापूस खरेदी केला. दरम्यान, देशभरातच कापूस उत्पादन घटल्याने बाजारात आवक कमी झाली. याच पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी सीसीआयने यंदाच्या हंगामात खरेदी ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात छगन भुजबळ यांची निर्दोष मुक्तता

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाकडून देखील छगन भुजबळ यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.**

यापूर्वी न्यायालयीन पातळीवर दिलासा मिळाल्यानंतर आता ईडीकडूनही क्लीन चिट मिळाल्याने भुजबळ यांच्यावरील सर्व आरोपांवर पडदा पडला आहे. त्यामुळे महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात छगन भुजबळ यांना मोठा कायदेशीर दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे. या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण येण्याची शक्यता असून, राष्ट्रवादी काँग्रेससाठीही हा मोठा दिलासा मानला जात आहे. सप्टेंबर २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने छगन भुजबळ यांना या प्रकरणातून दोषमुक्त केले होते.



न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले होते की, विकासकाने भुजबळ किंवा त्यांच्या कुटुंबीयांना १३.५ कोटी रुपये दिल्याचा कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही. तसेच, एसीबीकडून मांडण्यात आलेला नफा-तोट्याचा हिशोब चुकीचा आणि कायद्याच्या चौकटीबाहेर असल्याचेही न्यायालयाने सांगितले होते. न्यायालयाने असेही स्पष्ट केले होते की, कंत्राटासंदर्भातील अहवाल तत्कालीन ▶▶ पान २ वर

# जनगणनेची प्रश्नावली प्रसिद्ध ३३ प्रश्नांची द्यावी लागणार उत्तरे




दिल्ली । वृत्तसंस्था

देशभरात तब्बल १५ वर्षांनी जनगणना करण्यात येणार आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल ते ३० सप्टेंबरच्या दरम्यान होणार आहे. याबाबतच भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्तांनी धिसूचना काढली असून, या अधिसूचनेमध्ये जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात नागरिकांना विचारण्यात येणाऱ्या ३३ प्रश्नांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या पूर्वी २०२० मध्ये जनगणनेसाठी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची अधिसूचना जारी ▶▶ पान २ वर

### ३० लाख कर्मचारी अन् डिजिटल पद्धत

२०२७ ची जनगणना पूर्णत: डिजिटलपद्धतीने होणार आहे. सुमारे ३० लाख कर्मचारी मोबाईल ॲपच्या मदतीने माहिती गोळा करणार आहेत. त्यामुळे जनगणना पेपरलेस होणार आहे. तसेच स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जनगणनेत जातीचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी, ब्रिटीश काळात १९३१ सालापर्यंत जातनिहाय जनगणना करण्यात आली होती.

# विकसित भारतासाठी देशाची एकजूट–पंतप्रधान मोदी

तिरुअनंतपुरम । वृत्तसंस्था

**विकसित भारताच्या निर्मितीत आपली शहरे महत्त्वाची भूमिका बजावतात. गेल्या ११ वर्षांत केंद्र सरकार शहरी पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. केंद्र सरकार शहरी गरीब कुटुंबांसाठी बरेच काम करत आहे. केरळमधील सव्वा लाख शहरी गरिबांना त्यांची कायमस्वरूपी घरे मिळाली आहेत. त्यामुळे विकसित भारतासाठी देशात एकजूट निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.**



मोदी यांनी शुक्रवारी केरळच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजधानी तिरुअनंतपुरममध्ये एक भव्य रोड शो आयोजित केला होता. यावेळी मोदी म्हणाले की, एलडीएफ आणि यूडीएफ यांनी वेगवेगळ्या प्रकारे केरळला भ्रष्टाचार, गैरव्यवस्थापन आणि तुष्टीकरणाच्या राजकारणाच्या दुष्टचक्रात ढकलले आहे. त्यांचे झेंडे आणि चिन्हे वेगवेगळी असली तरी, त्यांचे राजकारण आणि अजेंडे मोठ्या प्रमाणात सारखेच आहेत: प्रचंड भ्रष्टाचार, जबाबदारीचा अभाव आणि फुटीरतावादी सांप्रदायिकतेला प्रोत्साहन. दोन्ही पक्षांना माहित आहे की त्यांना दर पाच वर्षांनी सत्ता गाजवण्याची संधी मिळते. परंतु मूलभूत समस्या ▶▶ पान २ वर

# माझ्या पतीची आत्महत्या नाही हत्याच !

## मयत जिएसटी अधिकाऱ्याच्या पत्नीचा दावा, पोलिस ठाण्यासमोर नातेवाईकांचा ठिय्या

बीड । प्रतिनिधी

माझे पती आत्महत्या करूच शकत नाही, त्यामुळे या प्रकरणाचा योग्य तपास करून आरोपीला तात्काळ अटक करा अशी मागणी मयत जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांच्या पत्नी मयुरी जाधवर यांनी केली. धुळे-सोलापूर मार्गावर सचिन जाधवर यांचा मृतदेह त्यांच्या कारमध्ये आढळला होता. त्यावेळी त्या कारमध्ये मडके आणि कोयताही सापडल्याने त्यांच्या मृत्यूचे गुढ वाढले आहे. योग्य तपास व्हावा आणि



दोषींवर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी नातेवाईकांनी शुक्रवारी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यासमोर ठिय्या दिला.

मयत जीएसटी अधिकारी सचिन जाधववर यांच्या पत्नीने मोठा दावा केला आहे. आठ दिवसांपासून माझ्या पतीला मानसिक त्रास दिला जात होता. त्यांच्या कारमध्ये सुसाईड नोट सापडल्याचे सांगितले जाते. मात्र ती आम्हाला दाखवण्यात आलेली नाही. ती सुसाईड नोट आम्हाला दाखवावी तसेच दोषी अधिकाऱ्याचे नाव समोर येत आहे, त्याला थेट शिक्षा व्हावी अशी मागणी मयत सचिन जाधवर यांच्या पत्नी मयुरी जाधवर यांनी केली आहे. माझे पती आत्महत्या करूच शकत नाहीत, असा ठाम दावा करत त्यांनी पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली. गेल्या काही दिवसापूर्वी त्यांच्या पतीचा धुळे-सोलापूर महामार्गालगत पाली जवळ मृतदेह आढळला होता. माझी फिर्याद नोंदवून आरोपीला तात्काळ ▶▶ पान २ वर

# पंतप्रधान मोदींकडून इतिहासाची मोडतोड; काँग्रेसचा गंभीर आरोप

दिल्ली । वृत्तसंस्था

काँग्रेसने शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर तीव्र हल्ला चढवला. पक्षाने म्हटले आहे की, पंतप्रधान इतिहासाची मोडतोड आणि विकृतीकरण करण्यात सर्वात तज्ञ आहेत. गेल्या महिन्यात संसदेत वंदे मातरमवरील चर्चेदरम्यान राष्ट्रगीताचा इतिहास विकृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि रवींद्रनाथ टागोरांचा अपमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, असा आरोप काँग्रकडून करण्यात आला आहे.

काँग्रेसचे संपर्क प्रभारी आणि सरचिटणीस जयराम रमेश यांनी आरोप केला आहे की, पंतप्रधान मोदी पद्धतशीरपणे महात्मा गांधींच्या स्मृती आणि वारसा पुसून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. ▶▶ पान २ वर

# एच-१बी व्हिसामुळे नोकऱ्या संकटात

वॉशिंग्टन । वृतसंस्था

अमेरिकेतील नोकऱ्या वाचविण्यासाठी आणि परदेशी कामगारांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अमेरिकेतील फ्लोरिडा हे राज्य मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. राज्यातील विद्यापीठांत एच-वन बी व्हिसावर होणा-या नवीन नियुक्त्या एक वर्षासाठी थांबविण्याचा विचार गव्हर्नर्स बोर्ड करत आहे. फ्लोरिडा गव्हर्नर्स बोर्डाच्या २९ जानेवारी २०२६ रोजीच्या बैठकीत हा ठराव सादर केला जाणार आहे.

गव्हर्नर्स बोर्डाने हा ठराव संमत केल्यानंतर फ्लोरिडातील सार्वजनिक विद्यापीठांना २०२७ च्या सुरुवातीपर्यंत एच-१बी व्हिसावर नवीन प्राध्यापक किंवा कर्मचारी नियुक्ती करता येणार नाही. यानंतर आता प्रतिभावान कर्मचा-यांची भरती आणि स्थलांतर ▶▶ पान २ वर

# मुंबईच्या महापौरसाठी दोन्ही सेना एकत्र येणार!

## उद्धवसेनेकडून शिंदेसेनेला भावनिक पण कोंडी करणारी साद ; भास्कर जाधव अग्रेसर

मुंबई । प्रतिनिधी

महापौर पदाच्या अरक्षणाची सोडत जाहिर झाल्यानंतर आता महापौरपदासाठी राजकीय खलबते सुरू झाले असून, मुंबई महानगर पालिकेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने एक मोठी राजकीय खेळी खेळली आहे. शिवसेना संस्थापक स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील







शिवसेनेने भाजपऐवजी ठाकरे गटाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा, असे आवाहन शिवसेना (यूबीटी) नेते भास्कर जाधव यांनी शुक्रवारी केले. हाच बाळासाहेबांना खरा मानाचा मुजरा ठरेल, अशी भावनिक सादही त्यांनी यावेळी घातली.

मुंबई महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. मात्र, भाजप (८९ जागा) आणि शिंदे यांची शिवसेना (२९ जागा) या महायुतीने ११४ हा बहुमताचा आकडा पार केला आहे. दुसरीकडे, २५ वर्षे पालिकेवर एकहाती सत्ता गाजवणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला ६५ जागांवर समाधान मानावे लागले आहे. गुरुवारी काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीत मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या पार्श्वभूमीवर, भास्कर जाधव यांनी शिंदे गटासमोर ही अनपेक्षित मागणी ठेवली आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना भास्कर जाधव म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. ज्या मुंबई पालिकेवर बाळासाहेबांचे आयुष्यभर वर्चस्व राहिले, तिथे त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात शिवसेनेचा (ठाकरे गट) महापौर नसणे हे अत्यंत ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तब्बल ७७ वर्षांनी अमेरिका डब्ल्यूएचओ मधून बाहेर

न्युयॉर्क: अमेरिकेने जागतिक आरोग्य संघटनेतून (डब्ल्यूएचओ) माघार घेतली आहे. संघटनेच्या जिनेव्हामधील मुख्यालयावरून देशाचा ध्वजही काढून टाकण्यात आला आहे. अमेरिकेच्या आरोग्य आणि परराष्ट्र विभागांनी ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाची पुष्टी करणारे एक निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये अमेरिका आता डब्ल्यूएचओमधून माघार घेत आहे, असे असले तरी संघटनेचे थकीत असलेले २६ अब्ज डॉलर्सचे कर्ज देखील अमेरिका भरणार असल्याचे म्हटले आहे. हे अंमलात आणण्यासाठी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. संघटनेतून माघार घेण्याचा अमेरिकेचा निर्णय माहिती व्यवस्थापित, नियंत्रण आणि सामायिक करण्यात अपयशी ठरल्यामुळे उद्भवला आहे. माहिती नियंत्रित, व्यवस्थापन आणि सामायिक करण्यात या अपयशामुळे अमेरिकेचे ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाले आहे.

### अखेर विकास गोगावले पोलिसांना शरण

महाड: महाड नगर पालिका निवडणुकीदरम्यान झालेल्या राडा प्रकरणामुळे चर्चेत असलेले आमदार भरत गोगावले यांचे चिरंजीव विकास गोगावले अखेर पोलिसांना शरण आला आहे. मागील दीड महिन्यांपासून फरार असलेला विकास गोगावले शुक्रवारी महाड शहर पोलिस ठाण्यात स्वत:हून हजर झाला. न्यायालयाच्या कडक आदेशानंतर त्याने हे पाऊल उचलले आहे. महाड नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दोन राजकीय गटांत मोठा राडा झाला होता. या हिंसाचार आणि राडा प्रकरणात विकास गोगावले यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास सुरू झाल्यापासून विकास गोगावले अटकेच्या भीतीने फरार होता. पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी छापेमारी केली होती, मात्र तो सापडला नव्हता. न्यायालयाने पोलिसांसमोर शरण येण्याचे आदेश दिले होते.

### बाजार कोसळला; ६ लाख कोटी रुपयांचे नुकसान!

मुंबई: देशांतर्गत शेअर बाजारात शुक्रवारी जोरदार घसरण पाहायला मिळाली. सकाळी बाजाराने सकारात्मक सुरुवात केली होती, पण काही वेळातच परिस्थिती बदलली आणि विक्रीचा जोर वाढला. परिणामी सेन्सेक्स ८०० अंकांहून अधिक घसरला, तर निफ्टीही जोरदार आपटला. दुपारी २.२३ वाजताच्या सुमारास सेन्सेक्स ८००.५२ अंकांनी (०.९७%) घसरून ८१,५०६.८५ वर व्यवहार करत होता. तर निफ्टी २४०.१० अंकांनी (०.९५%) घसरून २५,०४९.८० पर्यंत खाली आला. या घसरणीचा थेट फटका गुंतवणूकदारांना बसला. बीएसईमध्ये लिस्टेड कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल (मार्केट कॅप) ५.७ लाख कोटींनी कमी झाले. त्यामुळे बीएसईवरील एकूण मार्केट कॅप ४५२.६९ लाख कोटींवर आले. म्हणजेच काही तासांतच बाजारातून लाखो रुपये गायब झाले.

### सहर शेख यांना 'ते' विधान भोवले, पोलिसांची नोटीस

ठाणे: ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा परिसर पूर्णपणे हिरवा रंगवणार अशी टिप्पणी केल्याप्रकरणी एआयएमआयएमच्या नवनिर्वाचित नगरसेवक सहर शेख यांना पोलिसांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता (बीएनएसएस) अंतर्गत नोटीस बजावली आहे. ठाणे महानगरपालिका निवडणुकीत वॉर्ड क्रमांक ३० मधून विजयी झाल्यानंतर नगरसेविका सहर शेख यांनी केलेल्या भाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या भाषणात त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका करत पुढील पाच वर्षांत मुंब्रा पूर्णपणे हिरवा रंगवण्याचा मानस असल्याचे म्हटले होते. या वक्तव्यावर आक्षेप घेत भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीत या विधानांना चिथावणीखोर आणि जातीय तणाव निर्माण करणारे ठरवत कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली.

### तामिळनाडू विधानसभेत मनरेगाचे समर्थन

चेन्नई: तामिळनाडू विधानसभेत शुक्रवारी मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी सादर केलेला एक विशेष ठराव मंजूर करण्यात आला. यातून केंद्र सरकारच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे नाव बदलणे आणि त्याच्या निधी वितरण रचनेत बदल करण्याच्या निर्णयाला विरोध दर्शवण्यात आला आहे. ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणाऱ्या कायद्यासाठी महात्मा गांधींचे नाव कायम ठेवावे आणि कामाच्या मागणीवर आधारित पुरेसा आणि सातत्यपूर्ण निधी पुरवावा, अशी विनंती या ठरावाद्वारे करण्यात आली आहे. केंद्राने मनरेगाचे नाव बदलून त्याजागी विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजीविका मिशन अर्थात व्हीबी– जी राम जी कायदा आणला आहे. त्याला विरोधी पक्षांकडून विरोध सुरुच आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२.५० क्विंटल | २,६१० | ३,८३० | ३,१८० |
| ज्वारी/हायब्रिड: ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १३६.५० क्विंटल | ४,४४१ | ७,८५१ | ७,३९१ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,१५१ | ३,२६१ | २,७५४ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ६,७०० | ६,१३३ |

## अग्रलेख

# आत्मपरीक्षणाचा आरसा...

राजकारणात सत्तेची स्पर्धा, संख्याबळाची गणिते आणि संधिसाधूपणाचे व्यवहार इतके वाढले आहेत की, मूल्यनिष्ठ राजकारण दुर्मीळ होत चालले आहे. अशा काळात भाजपचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेचे सदस्य संदीप जोशी यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेण्याची घोषणा करणे, ही केवळ एका नेत्याची वैयक्तिक माघार नसून, आजच्या राजकीय संस्कृतीवर मारलेली तीव्र टिप्पणी आहे.

संदीप जोशी हे संघटनात्मक बांधिलकी, वैचारिक निष्ठा आणि सातत्यपूर्ण कामासाठी ओळखले जाणारे नेतृत्व. सत्ता, पद किंवा प्रतिष्ठा यापेक्षा विचारधारेचा आग्रह आणि कार्यकर्त्यांशी असलेली नाळ, हे त्यांच्या राजकारणाचे वैशिष्ट्य राहिले आहे. त्यामुळेच त्यांनी घेतलेला निर्णय अधिक अस्वस्थ करणारा ठरतो. कारण हा निर्णय व्यवस्थेच्या अपयशाची साक्ष देतो. आजचे राजकारण मूल्यांपेक्षा संख्याबळाभोवती फिरत आहे. कोण कुठून आला, कोण कुठे गेला, किती आमदार जमा झाले यालाच यशाचे मोजमाप मानले जात आहे. विचारधारा, निष्ठा, सातत्य यांना दुय्यम स्थान दिले जात असल्याची भावना जोशी यांच्या शब्दांतून स्पष्टपणे व्यक्त होते. पक्षांतराच्या राजकारणामुळे केवळ सामान्य मतदारच नव्हे, तर निष्ठावान कार्यकर्त्यांचाही लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याची त्यांची चिंता दुर्लक्षित करून चालणार नाही. जोशी यांचा प्रश्न हा ''मला संधी मिळाली नाही'' असा वैयक्तिक नाही; तर ''निष्ठेला किंमत उरली आहे का?'' हा सामूहिक प्रश्न आहे. मर्यादित संधी, वाढलेल्या अपेक्षा आणि सत्तेसाठी चाललेली असह्य स्पर्धा यामुळे कुणालाच थांबायचे नाही, ही त्यांनी मांडलेली वास्तववादी भूमिका आजच्या राजकारणाचे भयावह चित्र उभे करते. जे टिकून राहतात, त्यांच्याकडे दुर्लक्ष; जे उडी मारतात, त्यांचे स्वागत हा विरोधाभास लोकशाहीस घातक ठरणारा आहे. संदीप जोशी यांची माघार ही भाजपपुरती मर्यादित मानता येणार नाही. ती संपूर्ण राजकीय व्यवस्थेसाठी इशारा आहे. अनुभवी, विचारशील आणि संघटनात्मक बांधिलकी असलेले नेतृत्व जर बाजूला होत असेल, तर भविष्यात राजकारण कोणाच्या हातात जाणार, हा प्रश्न गंभीर आहे. लोकप्रियता, व्यवहारकुशलता आणि तात्कालिक यश याच्या पलिकडे पाहणारे नेतृत्व दुर्मिळ होत चालले आहे.

संदीप जोशी यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेण्याची घोषणा केल्यानंतर त्यांच्या निवासस्थानाबाहेर भावनिक वातावरण निर्माण झाले. त्यांच्या निर्णयाचे वृत्त समजताच मोठ्या संख्येने भाजप समर्थक व कार्यकर्ते तेथे जमा झाले आणि राजकीय संन्यासाचा निर्णय मागे घ्यावा, अशी कळकळीची मागणी जोशी यांना केली. अनेक कार्यकर्त्यांना आपल्या नेत्याच्या निवृत्तीच्या विचाराने अश्रू अनावर झाले होते. तर काहींनी घोषणाबाजी करत जोशी यांच्या नेतृत्वावर असलेला विश्वास आणि प्रेम व्यक्त केले. कार्यकर्त्यांनी यावेळी जोशी यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पक्षासाठी त्यांनी केलेल्या प्रदीर्घ कार्याची आठवण करून देत, त्यांच्या अनुभवाची व मार्गदर्शनाची पक्षाला नितांत गरज असल्याचे कार्यकर्त्यांनी ठासून सांगितले. जोशी यांचा निर्णय केवळ वैयक्तिक नसून, हजारो निष्ठावान कार्यकर्त्यांच्या भावना त्याच्याशी जोडल्या गेल्या असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या निवासस्थानाबाहेर जमलेली कार्यकर्त्यांची गर्दी आणि ''निर्णय मागे घ्या'' ही भावनिक मागणी, हेच सिद्ध करते की अजूनही निष्ठेचे राजकारण जिवंत आहे. प्रश्न इतकाच आहे की, पक्ष आणि व्यवस्था अशा नेतृत्वाला सावरणार की गमावणार? संदीप जोशी यांचा निर्णय हा संन्यासापेक्षा अधिक आहे तो आत्मपरीक्षणाची मागणी आहे. सत्ता, संधी आणि संख्याबळाच्या पलीकडे जाऊन राजकारणाला पुन्हा मूल्यांची दिशा देण्याची ही शेवटची घंटा ठरू नये, एवढीच अपेक्षा.



## राजेश्वरी महाविद्यालयात जयंती साजरी

**सचिन काळुंके । कर्जत**

अंबड तालुक्यातील कर्जत येथे राजुरेश्वर महाविद्यालयात बाळासाहेब ठाकरे जयंती व सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्रगतशील शेतकरी पांडुरंग तात्या डोंगरे माजी सरपंच विजय काका डोंगरे , संजय काळुके, चेअरमन ज्ञानेश्वर भाऊ डोंगरे उपसरपंच आण्णासाहेब डोंगरे माजी सरपंच शिहरी काका डोंगरे विष्णू चिधे नशिरभाई शेख सुरेश भाऊ उगले अंबादास सानप विजय ज्ञानदेव डोंगरे नारायण थेटे प्राचार्य विलास टकले यांच्यासह शिक्षक वुद हजर होते.

# ना.अजितदादांकडून बीडकरांची अपेक्षापूर्ती

## आ.पंडित यांच्या मागणीनुसार बीड शहरातील रस्त्यांना २२ कोटी रुपयांचा निधी

**बीड । प्रतिनिधी**

ना.अजितदादा पवार यांनी पालकमंत्री पद स्विकारल्यानंतर जिल्ह्यात विकासाचे अनेक महत्वाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. नगर पालिका निवडणुकीत अजितदादा पवार यांनी बीडकरांना विकासावर मत मागितले आणि बीडच्या सुजान जनतेनेही त्यांच्या शब्दाला मान दिला. आता अजितदादा पवार यांनीही बीडकरांची अपेक्षापूर्ती करण्यास सुरुवात केली आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी बीड शहरातील जनतेचे जिव्हाळ्याचे रस्त्याचे प्रश्न ना.अजितदादा पवार यांच्यासमोर मांडल्यानंतर शहरातील विविध रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी आणि इतर विकास कामांसाठी २२ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून हाती घेण्यात आलेली ही विकास कामे लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. बीड शहरातील विकास कामांना निधी मंजुर केल्याबद्दल नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल यांच्यासह शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीच्या सर्व नगरसेवकांनी ना.अजितदादा पवार





व आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.

अनेक वर्षांपासून बीड शहरावर राज्य करणाऱ्या राज्यकर्त्यांनी बीडकरांना रस्ते, नाल्या, पथदिवे अशा मुलभूत सुविधांपासून वंचित ठेवले. बीडकरांचे साध्या-साध्या गोष्टींसाठी हाल होत असताना सत्ताधारी मात्र त्यांच्याच धुंदीत होते. बीडच्या सुजान जनतेने नगरपालिका निवडणुकीत पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या शब्दावर आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकत सत्ताधाऱ्यांची धुंद उतरवली. आता ना.अजितदादा पवार आणि आ. विजयसिंह पंडित हे देखील बीडच्या जनतेला निवडणुकीत दिलेल्या शब्दांना जागत असल्याचे दिसत आहेत. नगर पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला भरघोस विजय देणाऱ्या बीडच्या जनतेला निकालानंतर अवघ्या महिनाभरात विविध विकास कामांसाठी २२ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून २४ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. लवकरच या कामांची निविदा प्रक्रिया करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. बीड शहरातील विकास कामांना निधी मंजुर केल्याबद्दल नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल, अमर नाईकवाडे, शेख निजाम, मुजीबभाई, संजय उडाण, सादेक अली, बाळासाहेब गुंजाळ, अशफाक इनामदार, भैय्या मोरे, रणजित बनसोडे, जैतुल्ला खान, प्रमोद शिंदे, जकी सौदागर, शेख बिलाल, महेश धांडे, मनोज गोडसे, दत्ता जाधव, शेख खय्युम, वाजेद कुरेशी, विश्वनाथ चक्रे यांच्यासह शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीच्या सर्व नगरसेवकांनी ना.अजितदादा पवार व आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.

## आदर्श नगरच्या संकल्पसिद्धी हनुमान मंदिरात हरीनाम सप्ताह

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील नगर नाका भागात असलेल्या संकल्पसिद्धी हनुमान मंदिर, आदर्श गणेशनगर येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी २३ जानेवारी २०२६ पासून ह.भ.प. सदाशिव महाराज झणझने यांच्या मार्गदर्शनाखा अखंड हरिनाम सप्ताहाचे प्रारंभ झाला. या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत.**

या सप्ताहात प्रवचन दुपारी ४.०० ते ५.०० या वेळात तर रात्री ८.०० ते १०.०० दरम्यान कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. दि.२३ रोजी गणेश महाराज आमटे यांचे प्रवचन तर रामायणाचार्य ह.भ.प. उद्धव महाराज चोले यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते.दि.२४ रोजी सुरेश महाराज जाधव यांचे प्रवचन तर तुकाराम महाराज मुंडे, टोकवाडी, परळी यांचे कीर्तन, दि.२५ रोजी ह.भ.प. श्रीमंत महाराज यांचे प्रवचन, महंत ह.भ.प. अतुलशास्त्री महाराज, भगवानबाबा संस्थान, तागडगाव यांचे कीर्तन होणार आहे. दि.२५ जाने. रोजी ह.भ.प. अरुण डाके यांचे प्रवचन, तर सदाशिव महाराज झणझणे यांचे कीर्तन, दि.२७ रोजी ह.भ.प. उषाताई महाराज मुंडे यांचे प्रवचन, तर ह.भ.प. प्रभाकर महाराज आंधळे यांचे कीर्तन, दि. २८ जाने. रोजी मोहन महाराज खरमाटे यांचे प्रवचन, तर नंदिनी महाराज मौद, दि.२९ जाने. रोजी ह.भ.प. डॉ. भागवत मोटे यांचे प्रवचन तर ह.भ.प. अप्पा महाराज चौरे यांचे कीर्तन होणार आहे. शुक्रवार दि.३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते १.०० दरम्यान महामंडलेश्वर स्वामी १००८ त्रिविक्रमानंद सरस्वतीजी यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

## बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीस न्यायालयाने ठोठावली १० वर्षाची शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**

**पोलीस ठाणे पेठ बीड येथे फिर्यादी यांनी दिनांक २६/०५/२०२१ रोजी पोलीस ठाणे पेठ बीड येथे फिर्याद दिली की, दिनांक २६/०५/२०२१ रोजी १४.४५ वाजण्याचे सुमारास फिर्यादीचे पत्नीने फिर्यादी सांगीतले की, त्यांची अल्पवयीन मुलगी ही घरात दिसुन येत नसल्याने ती कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळुन नेल्याचे समजुन आल्याने फिर्यादी यांचे फिर्यादीवरुन पोस्टेला गुरनं ९६/२०२१ कलम ३६३ भावि प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.**

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक जे.एच. पठाण यांनी करुन त्यांनी सदर गुन्हयातील आरोपी सर्फराज पि.अ. रशीद सय्यद यास दिनांक २९/०५/२०२१ रोजी अटक करुन सदर गुन्हयाचा तपास शास्त्रोक्त पदधतीने केला व घटनास्थळ पंचनामे करुन पिडीत मुलीची व आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन सदर मुलीवर यातील आरोपी याने बळजबरी केल्याचे निष्पन्न झाल्यावर आरोपी विरुदध पुरावे गोळा करुन कलम ३६३,३६६ (अ),३७६,३७६ (२) (जे) भा.द.वि.सह कलम ३,४ बालकांचे लैंगीक अत्याचारापासुन संरक्षण अधि.२०१२ प्रमाणे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या खटल्यात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील सुहास सुलाखे यांनी प्रभावीपणे बाजु मांडली. सर्व साक्षी पुरावे व साक्षी तपासुन मा. अति. सत्र न्यायाधीश -१ व्हि.एच. पाटवदकर यांनी दिनांक २०/०१/२०२६ रोजी निकाल दिला न्यायालयाने आरोपी सर्फराज पि.अ. रशीद सय्यद यास अल्पवयीन मुलीस पळवुन नेणे, व तिच्यावर बलात्कार करणे अशा ३६३,३६६ (अ),३७६,३७६(२) (जे) भा.द.वि.सह कलम ३,४ बालकांचे लैंगीक अत्याचारापासुन संरक्षण अधि.२०१२ कलमाखाली १० वर्षे सक्त मजुरी व ९००० रुपये दंड ठोठावला आहे. सदर गुन्हयाचे तपासामध्ये तपासी अधिकारी जी. एच. पठाण यांना तपासामध्ये पोह/१७७२ सिराज पठाण व पोह/१३५३ सुभाष मोठे यांनी मदत केली होती. सदर गुन्हयामध्ये साक्षीदार यांना वेळेत हजर ठेवण्याचे काम पैरवी अधिकारी म्हणुन सफौ / ५९३ बाळासाहेब सानप यांनी मदत केली आहे. या प्रकरणातुन तपास अधिकारी, सरकारी वकील व न्यायालय यांच्या समन्वयामुळे पीडीतास न्याय मिळाला असुन, कायदा सर्वासाठी समान आहे व गुन्हा करणा-यास शिक्षा अटळ आहे. हा ठाम संदेश समाजात गेला आहे. बीड पोलीसांच्या कार्यक्षम व जबाबदार कामगिरीचे हे एक उत्तम उदाहरण आहे.



## लालबहादूर शास्त्री विद्यालयात पालक मेळावा संपन्न

**परतुर । प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना मोबाईल पासून दूर ठेऊन मैदानी खेळात सहभागी करण्यास पालकांनी पुढाकार घ्यावा असे उदगार परतूर येथील लाल बहादूर शास्त्री कन्या विद्यालयात आयोजित पालक मेळाव्यात बोलताना उपनागराध्यक्षा विशाखा राखे यांनी काढले यावेळी व्यासपीठावर कन्या शाळेची माजी विद्यार्थी नगरसेविका स्नेहा अग्रवाल,कस्तुरबा गांधी वसतिगृहाच्या अधिक्षका मंगल खवणे,निवृत्त शिक्षक तुकाराम जईद,निवृत्त प्राचार्य रामराव घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.**

परतूर येथील लाल बहादूर शास्त्री कन्या विद्यालयात दि.२३ रोजी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुढे बोलताना श्रीमती राखे यांनी सांगितले की,मुलींच्या शिक्षणा बरोबर त्यांची सुरक्षितता पण महत्वाची असते आणि याबाबतीत कन्या शाळेचे शिक्षक फार तत्पर आहेत.तसेच मुलींना मोबाईल वापरावर पालकांनी बंदी घालावी अनावश्यक मोबाईल वापर टाळला पाहिजे असे सांगितले. यावेळी स्नेहा अग्रवाल यांनी बोलताना शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि मुलींना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पालकांचे खेळ घेण्यात आले प्रथम क्रमांक आलेल्या पालकांना पैठणी साडी भेट देण्यात आली या कार्यक्रमाला परतूर,खडकी,उस्मानपूर,जिरड गावं, चिंचोली,रोहिना,रेवळगाव येथील महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश बरीदे यांनी केले तर आभार श्रीमती वृन्दा डक यांनी मानले.

## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा मटका चालकास दणका!

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे तसेच वाळु माफीयांचे व अवैध मटका जुगार चालकाचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन व कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन प्रभारी अधिकारी पो.नि. पो.स्टे. केज यांनी गणेश सुधीर खराडे वय ३५ वर्षे रा. टेलरगल्ली, केज यांचे विरुध्द कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी यांना सादर केला होता.**

सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पो.स्टे. केज येथे कल्याण व मिलन मटका खेळणे व खेळवीणे तसेच १ रुपयाचे ९० रुपये देण्याचे अमिष दाखवुन बेकायदेशीर रित्या मटका जुगार चालविणे व साक्षीदारांना धमक्या देणे शिवीगाळ करणे अशा स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे याकरीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती. तरीसुध्दा त्याने त्याचे वर्तणात सुधारना केली नाही. सदर इसमाविरुध्द पो.स्टे. केज येथे एकुण १० गुन्हे दाखल असुन त्यापैकी ०६ न्यायप्रविष्ठ व ०४ गुन्हे तपासावर आहेत. सदर प्रकरणात विवेक जॉन्सन जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक २२.०१.२०२६ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात





घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना संबधित पो. स्टे. प्रभारी अधिकारी व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा शिवाजी बंटेवाड व पो.उप नि. महेश विघ्ने स्थागुशा बीड यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत गोपणीय माहीतीच्या आधारे सदर इसमांना दि. २२.०१.२०२६ रोजी केज शरातुन ताब्यात घेऊन पो.स्टे. केज येथे हजर केले. तदनंतर पोनि. केज यांनी ताबे पोलीस अंमलदार मार्फत सदर इसमास हार्मुल कारगृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करुन स्थानबध्द केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत (भापोसे), अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, सपोअ केज व्यंकट राम पोनि स्थागुशा शिवाजी बंटेवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. स्वप्नील उनवणे, सपोनि मांजरमे, पोह गित्ते सर्व पो.स्टे. केज तसेच स्थागुशा बीड येथील पोउनि महेश विघ्ने, पोह/शेलार, पठाण, जोगदंड, घोडके तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, विबीषण चव्हाण सर्व नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या, खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर, बेकायदेशीर जुगार व लॉटरी चालवणारे व्यक्तीवर जास्तीत जास्त व कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत (भापोसे) यांनी दिले आहेत.

## पान १ वरून...

### कापूस भाववाढीचा फायदा

केलेल्या कापसाची विक्री सुरू केली. त्याचा थेट परिणाम बाजारभावावर झाला आणि कापसाचे दर हमीभावाच्या पातळीपर्यंत, तर काही ठिकाणी त्याही पुढे गेले. क्विंटलमागे दीड ते दोन हजार रुपयांची सुधारणा झाली असताना, दोन ते अडीच महिन्यांपूर्वी कमी दरात विक्री केलेल्या शेतकऱ्यांना मात्र याचा कोणताही लाभ मिळाला नाही. वेचणी पूर्ण झाल्यानंतर कापसाच्या भावात वाढ होईल, अशी कोणतीही अपेक्षा नसल्याने शेतकऱ्यांनी तातडीने कापूस विक्री केला. सध्या अनेक शेतकऱ्यांकडील कापूस पूर्णपणे संपल्यानंतरच बाजारात दरवाढ झाली आहे. अतिवृष्टीमुळे वाढलेला उत्पादन खर्च आणि त्याच्या तुलनेत मिळालेला कमी भाव यामुळे शेतकरी आधीच अडचणीत असताना, उशिराने झालेली भाववाढ ही केवळ व्यापाऱ्यांसाठीच लाभदायक ठरल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

-------------

### जनगणनेची प्रश्नावली प्रसिद्ध

करण्यात आली होती. परंतु कोविड-१९ च्या महामारीमुळे जनगणना पुढे ढकलण्यात आली. त्यामध्ये ३१ प्रश्न होते. आता मात्र ३३ प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. राजपत्रित अधिसूचनेत ३३ प्रश्नांची रूपरेषा आखण्यात आली आहे. यामध्ये घर, कुटुंब, वाहन संबंधित प्रश्न आहेत. त्याचे उत्तरे कुटुंब प्रमुखाने देणे अपेक्षित आहे. तसेच पिण्याचे पाणी, घरातील फरशी व छतांसाठी वापरलेले साहित्य, विवाहित जोडप्याची संख्या, धान्याचा वापर, कुटुंब प्रमुखाचे लिंग, जीवनावश्यक वस्तुंची माहिती आदी प्रश्नांचा समावेश आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने यापूर्वी सांगितले होते की, जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल ते ३० सप्टेंबर असेल. यामध्ये प्रत्येक राज्य आणि केंद्राशासित प्रदेश त्यांच्या येथील काम ३० दिवसात पूर्ण करेल. तसेच घराची यादी सुरु होण्यापूर्वी १५ दिवस नागरिकांना स्वत: माहिती भरण्याचा पर्याय देण्यात येईल.

------------

### महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात

मुख्यमंत्री विलासराव देशमुख, परिवहन मंत्री तसेच सात वरिष्ठ नोकरशहांच्या समितीसमोर सादर करण्यात आला होता. त्यामुळे केवळ चुकीची माहिती देऊन या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल झाली, असे मान्य करणे कठीण असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले होते. महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २०१५ मध्ये भुजबळ यांच्या मुंबई, ठाणे आणि नाशिक येथील १७ मालमत्तांवर छापे टाकले होते. पदाचा गैरवापर आणि फसवणुकीचे आरोप ठेवत गुन्हे दाखल करण्यात आले होते. या कारवाईत मुंबईतील ७, ठाणे आणि पुण्यात प्रत्येकी २, तर नाशिकमधील ५ मालमत्तांचा समावेश होता. दरम्यान, नवी मुंबईतील 'हेक्सवर्ल्ड' गृहनिर्माण प्रकल्प प्रकरणातही भुजबळ कुटुंबाला यापूर्वी दिलासा मिळाला होता. या प्रकल्पात सदनिका खरेदीदारांची फसवणूक केल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे चिरंजीव पंकज भुजबळ आणि पुतण्या समीर भुजबळ यांच्यावर करण्यात आला होता. मात्र, सप्टेंबर २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने या दोघांनाही या प्रकरणातून दोषमुक्त केले होते. एसीबी आणि ईडी या दोन्ही तपास यंत्रणांच्या प्रकरणांतून सुटका झाल्याने छगन भुजबळ यांना मोठा कायदेशीर आणि राजकीय दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे.

------------

### माझ्या पतीची आत्महत्या

अटक करावी, अशीही मागणी त्यांनी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. सचिन जाधवर हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील चुंब या गावचे रहिवाशी आहेत. ते २०१२ च्या एमपीएससी परीक्षेत राज्यात पहिले आले होते. मागील काही वर्षांत ते बीडच्या जीएसटी कार्यालयात सेल्स टॅक्स ऑफिसर म्हणून कार्यरत होते. शुक्रवारी राहत्या घरातून बाहेर पडलेले सचिन जाधवर शनिवार पर्यंत घरी पोहोचले नव्हते. त्यामुळे त्यांच्या पत्नी मयुरी जाधवर यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी मोबाईल लोकेशनद्वारे जाधवर यांचा शोध घेतला असता बीड जवळील कपिलधारवाडी परिसरात त्यांचा मृतदेहच गाडीत संशयास्पदरित्या आढळून आला. बंद कारमध्ये मडक्यात कोळसा आणि लाकूड जाळून धूर केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले. या प्रकरणात घातपाताचा संशय आल्याने पोलिसांनी फॉरेन्सिक टीमच्या माध्यमातून या संपूर्ण प्रकाराचा तपास सुरू केला. शवविच्छेदना दरम्यान, जाधवर यांच्या मृतदेहाजवळ सुसाईड नोट आढळली आणि यात आत्महत्येचे कारण वरिष्ठाच्या त्रासाचे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पोलिसांनी एका अधिकाऱ्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. उपलब्ध झालेल्या पुराव्यानुसार पुढील कारवाई सुरू असल्याचे बीड पोलिसांनी सांगितले आहे. जाधवर यांच्या मृत्यूचे गूढ संशयास्पद आहे. त्यामुळे या सर्व घटनेची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे.

-------------

### विकसित भारतासाठी देशाची

अजूनही कायम आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज संपूर्ण देश विकसित भारताच्या निर्मितीसाठी एकत्रितपणे काम करत आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत, देशभरात ४ कोटींहून अधिक घरे बांधण्यात आली आहेत आणि गरिबांना देण्यात आली आहेत. शहरी गरिबांसाठी १ कोटींहून अधिक घरे बांधण्यात आली आहेत. गरीब कुटुंबांचे वीज बील वाचावे, यासाठी पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजना सुरू करण्यात आली. आयुष्मान भारत अंतर्गत गरिबांना ५ लाख रुपयांची मोफत आरोग्य सेवा मिळत आहे. महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी मातृ वंदनासारख्या योजना तयार करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारने १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाला करमुक्त केले आहे. याचा केरळमधील लोकांना, विशेषतः मध्यमवर्गीय आणि काम करणाऱ्या व्यावसायिकांना मोठा फायदा झाला आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, गेल्या ११ वर्षांत लाखो देशवासीयांना बँकिंग व्यवस्थेशी जोडण्यासाठी लक्षणीय काम करण्यात आले आहे.

-------------

### एच-१बी व्हिसामुळे

धोरणावरून वाद सुरू झाला आहे. फ्लोरिडामधील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये जवळपास ४०० एच-वन बी व्हिसाधारक कार्यरत आहेत. परदेशी उमेदवारांच्या नियुक्तीवर अधिक भर दिला जात आहे. कौशल्य आधारीत क्षेत्रात विद्यापीठ कशापद्धतीने कामे करतात हे या संख्येतून दिसते असे मत एच-वन बी व्हिसा बंदीचे समर्थक मांडत आहेत. या ठरावानुसार फ्लोरिडातील सार्वजनिक विद्यापीठांना एच-वन बी व्हिसाद्वारे होणारी नवीन कर्मचारी भरती किमान एक वर्षासाठी करता येणार नाही. यामुळे विद्यमान एच झ्र वन बी व्हिसा धारकांना फटका बसणार नाही. पण, विद्यापीठांना नवीन कर्मचारी, संशोधकांची भरती करता येणार नाही. ठराव संमत झाल्यास राज्यभरात त्याची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे.

------------

### पंतप्रधान मोदींकडून इतिहासाची

गेल्या महिन्यात संसदेत राष्ट्रगीतावरील चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि त्यांचे सहकारी उघडे पडले. राष्ट्रगीताचा इतिहास विकृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचा अपमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला. २३ जानेवारी २०२६ रोजी, देश नेताजी सुभाषचंद्र बोस यांची १२९ वी जयंती साजरी करत आहे. त्यांनी १९३७ मध्ये वंदे मातरमच्या ओळींवरील वाद सोडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती, ज्या ओळी पंतप्रधान मोदींनी जाणूनबुजून त्यांच्या उल्लेखातून वगळल्या होत्या. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे पणतू आणि इतिहासकार सुगत बोस यांनी लिहिले आहे की, नेताजींनी २ नोव्हेंबर १९४२ रोजी बर्लिनमध्ये फ्री इंडिया सेंटरचे उद्घाटन केले होते आणि त्या काळात त्यांनी राष्ट्रगीताच्या वेळी जन गण मन गायले होते. नेताजींनी स्वतः ६ जुलै १९४४ रोजी सिंगापूरहून प्रसारित झालेल्या संदेशात महात्मा गांधींना राष्ट्रपिता म्हणून संबोधले होते. आता पंतप्रधान पद्धतशीरपणे महात्मा गांधींच्या स्मृती आणि वारसा पुसून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचे नवीनतम उदाहरण म्हणजे मनरेगा कायदा मागे घेणे, हे आहे, असे जयराम म्हणाले.

--------

### मुंबईच्या महापौरसाठी

क्लेषदायक आहे. जे लोक स्वतःला बाळासाहेबांच्या विचारांचे खरे वारसदार मानतात, त्यांनी ही उदारता दाखवायला हवी. एकनाथ शिंदे यांनी भाजपला स्पष्ट सांगावे की, केंद्रात आणि राज्यात जरी आपण मित्र असलो तरी, मुंबईत बाळासाहेबांच्या वारशासाठी आम्ही उद्धव ठाकरेंच्या उमेदवाराला पाठिंबा देऊ. मुंबई महापालिकेत सध्या सत्तेचे समीकरण पाहिले तर महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. मात्र, ठाकरे गटाने मराठी अस्मिता आणि बाळासाहेबांचे स्वप्न या मुद्द्यांना हात घालत शिंदे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या आवाहनाला काय प्रतिसाद देतात आणि मुंबईच्या महापालिकेत कोणती नवीन समीकरणे आकाराला येतात, हे पाहावे लागेल.

---------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. २४ जानेवारी २०२६



## थोडक्यात

### हिंदी भाषेला जागतीक स्तर प्राप्त झाले -डॉ.संतोष कुलकर्णी

पाटोदा । प्रतिनिधी

हिंदी भाषा राष्ट्रीय एकता अबाधित ठेवते असे प्रतिपादन सरस्वती महाविद्यालय लातूरचे हिंदी विभाग प्रमुख तथा लातूर जिल्हा हिंदी साहित्य परिषदेचे सचिव व सहचर हिंदी संघटन नई दिल्लीचे सचिव डॉ.संतोष कुलकर्णी यांनी केले. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर संलग्नित जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा व भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव, तसेच भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड, जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजीराव पंडित कला ,विज्ञान वाणिज्य महाविद्यालय शिवाजी नगर गढ़ी ता गेवराई तसेच एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालय बिडकीन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवशीय राष्ट्रीय ऑनलाईन वेबिनार मध्ये बोलत होते. वैश्विक परिदृश्य में हिंदी भाषा की चुनौतियां एवं संभावनाएं या विषयावर हा राष्ट्रीय वेबिनार या पाच महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो. डॉ. सदाशिव सरकटे, प्राचार्य कला व वाणिज्य महाविद्यालय पाटोदा हे होते. तर बीजभाषक म्हणून प्रो. डॉ. शबनम आलम हिंदी विभाग प्रमुख अलिगढ मुस्लिम विश्वविद्यालय अलीगढ ह्या होत्या. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये प्रो.डॉ.विश्वास कदम प्राचार्य शिवाजीराव पंडित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी, प्रो.डॉ.नितीन आहेर प्राचार्य कला महाविद्यालय बिडकीन, प्रो.डॉ.सुहास मोराळे प्राचार्य सावरकर महाविद्यालय बीड, प्रो.डॉ.मुकुंद देवर्षी प्राचार्य सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव हे उपस्थित होते.

### शिवाचार्य महाराजांच्या आशीर्वचनाने संत शिरोमणी मन्मथ स्वामी जन्मोत्सवाची सांगता

परळी । प्रतिनिधी

समस्त वीरशैव लिंगायत समाज परळीच्या वतीने श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी जन्मोत्सवानिमित्त श्री संत गुरूलिंग स्वामी मठ संस्थान, बेलवाडी येथे आयोजित तीन दिवसीय परमरहस्य पारायण प्रवचनाची सांगता आज शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी रोजी होत आहे. दिनांक २३ जानेवारी रोजी ष.ब्र.१०८ गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या आशीर्वचनाने श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. दुपारी १२ वाजून २१ मिनिटांनी जन्मोत्सव सोहळा पार पडणार असून, महाप्रसादाने परमरहस्य पारायणाची सांगता होईल.या कार्यक्रमास वीरशैव लिंगायत समाजातील सर्व महिला-पुरुष भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त वीरशैव लिंगायत समाज, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.



### इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलमध्ये मकरसंक्रातीच्या निमित्ताने हळदी-कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल मध्ये मकरसंक्रातीच्या सणाचे औचित्य साधुन हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सौ.शिल्पाताई भुसारी तर प्रमुख अतिथी म्हणून सौ.सोनाली पोखरकर व प्रमुख पाहुणे म्हणून सौ.रंजना भुसारी तसेच पालक प्रतिनिधी म्हणून सौ.सुषमा गुजर,सौ.प्रियंका थळकरी,सौ.सुप्रिया पाटू,सौ.वैभवी शिनगारे या उपस्थित होत्या यावेळी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांसाठी संगीत खुर्ची व तळ्यात-मळ्यात,उखाणे या स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धेमधील सौ.नम्रता मुळे,सौ.पुजा चौधरी,सौ.रोहिणी जाधव,सौ.जयश्री दोडके,सौ.सुप्रिया मुकदम,सौ.वैशाली मोरे या विजेत्या महिलांना सचिन कलेक्शन व इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल तर्फे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पैठणी साड्या व शाळेची दिनदर्शिका भेट म्हणुन देण्यात आल्या या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व महिलांना हळदी कुंकू लावून तिळगुळ देऊन वाण म्हणून इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलची दिनदर्शिका देण्यात आली या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.बापुसाहेब भुसारी,सर्व इरा स्टाफ व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.साक्षी खंडेलवाल यांनी तर प्रास्ताविक सौ.ज्योती वैरागे यांनी केले.



# एसडीएम कार्यालयाचे बांधकाम वादाच्या भोवऱ्यात

## निकृष्ट दर्जाच्या कामामुळे नागरिकांचा संताप, उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सध्या वादाच्या केंद्रस्थानी आले आहे. हे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संदर्भात संतप्त ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी लावून धरली आहे.

शासकीय कार्यालयांच्या इमारती या दीर्घकाळ टिकाऊ आणि दर्जेदार असणे अपेक्षित असते. मात्र, पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या बांधकामात वापरलेले साहित्य, सिमेंटचे प्रमाण आणि बांधकामाची एकूण पद्धत अत्यंत सुमार असल्याचे दिसून येत आहे.



ग्रामस्थांच्या ३ प्रमुख मागण्या:

१. उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी: या बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी राज्य शासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ एक विशेष तांत्रिक समिती नेमावी. या समितीने कामाचा दर्जा, साहित्याचा वापर आणि तांत्रिक त्रुटींची सविस्तर तपासणी करून अहवाल सादर करावा.२. कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई: कामात हलगर्जीपणा करणाऱ्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदाराला तातडीने काळ्या यादीत टाकावे. तसेच, या कामावर देखरेख ठेवणाऱ्या संबंधित विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी.३. खर्च वसुली: निकृष्ट कामामुळे भविष्यात इमारतीची जी दुरुस्ती करावी लागेल, त्याचा संपूर्ण खर्च शासनाच्या तिजोरीतून न भरता तो संबंधित कंत्राटदाराकडूनच वसूल करण्यात यावा.

भ्रष्टाचाराचा संशय आणि रोष

शासकीय कामात पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्याचे कडक निर्देश असतानाही, पाटोद्यात मात्र या नियमांना हरताळ फासल्याचे चित्र आहे. ''जनतेच्या करातून उभारल्या जाणाऱ्या या वास्तूमध्ये असा भ्रष्टाचार खपवून घेतला जाणार नाही,'' असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून कारवाई न केल्यास आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशाराही परिसरातील नागरिकांनी दिला आहे. आता या तक्रारींनंतर प्रशासन नेमकी काय भूमिका घेते आणि दोषींवर खरोखरच कारवाई होते का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

पाटोदा येथे तहसील कार्यालयाच्या बाजूला उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाचे नवीन इमारतीचे बांधकाम चालू असून

कोट्यवधी रुपयाचे बांधकाम चालू असून हे काम अतिशय निकृष्ट व सुमार दर्जाचे चालू चालू असून या कामावर संबंधित अधिकारी बांगर साहेब विभागीय अभियंता शाखा अभियंता यांचे दुर्लक्ष असून ते या कामावर फिरकत नसल्याचे दिसून येत आहे

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात वाचन संकल्प; महाराष्ट्राचा उपक्रम उत्साहात साजरा

किल्ले-धारूर । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले-धारूर येथे महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या वतीने ''वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' हा पंधरवडा दिनांक १ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत विविध शैक्षणिक, वाचनवर्धक व जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचनसंस्कृती बळकट करणे तसेच पारंपरिक व डिजिटल माहिती स्रोतांचा प्रभावी वापर कसा करता येईल याबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. पंधरवड्यानिमित्त दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन व डिजिटल रिपॉझिटरी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या




प्रदर्शनास विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक व वाचक वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, साहित्यिक पुस्तके, स्पर्धा परीक्षेची पुस्तके तसेच ई-बुक्स, ई-जर्नल्स व डिजिटल रिपॉझिटरीचे सादरीकरण करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने माहिती साधनांचा शैक्षणिक व संशोधनात्मक वापर कसा करता येतो, याचे प्रभावी दर्शन या उपक्रमातून घडले. दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. शिवशंकर घमुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वाचन ही केवळ सवय नसून व्यक्तिमत्त्व विकासाची सातत्यपूर्ण प्रक्रिया असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. गोपाळ काकडे यांनी नियमित वाचनामुळे व्यक्ती विचारशील व जबाबदार नागरिक बनते, असे मत व्यक्त केले. या कार्यशाळेत विविध विभागांतील विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ग्रंथपाल डॉ. गोपाळ सगर यांनी मानले. दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या वाचन कक्षामध्ये सामूहिक वाचन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास शिव व्याख्याते वैशालीताई डोळस प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या आधुनिक वाचकाभिमुख सेवांचे कौतुक करत, ''ग्रंथालय वाचकापर्यंत'' ही संकल्पना येथे प्रत्यक्षात उतरलेली दिसते, असे मत व्यक्त केले. तसेच दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी पुस्तक समीक्षात्मक लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या ग्रंथांवर अभ्यासपूर्ण समीक्षात्मक लेखन सादर केले. या स्पर्धेतील उत्कृष्ट स्पर्धकांचा सन्मान दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी ग्रंथ भेट देऊन करण्यात येणार आहे. एकूणच राजमाता जिजाऊ महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या वतीने राबविण्यात आलेला ''वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' हा उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध, अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. या पंधरवड्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून वाचनसंस्कृतीला नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## श्री संत मीराबाई (आईसाहेब) पुण्यतिथी सोहळ्या निमित्त अखंड हरीनाम सप्ताह !

पाटोदा । प्रतिनिधी

संत मीराबाई (आईसाहेब ) यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमीत्त शनिवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ पासुन पाटोद्यानजीक असलेल्या महासांगवी येथींल श्रीक्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थान येथे अखंड हरीनाम सप्ताहास सुरुवात होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज दु १ते ४ या वेळेत वाल्मिकी रामायण कथा प्रवक्ते रामायणाचार्य महामंडळेश्वर स्वामी जय नंद सरस्वतीजी, पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १०ते १२ गाथा भजन

नेतृत्व ( विठ्ठल म . सांगळे ), संध्याकाळी ८ ते १० या वेळेत हरिकिर्तन या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन या सोहळ्याची



जय्यत तयारी मठाधिपती राधाताई महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण झाली आहे. संत मीराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी सोहळ्या निमीत्त महासांगवी संस्थान या ठिकाणी अखंड हरीनाम सप्ताहात शनिवार दि. २४ फेबुवारी रोजी ह.भ.प. महेबुब महाराजशास्त्री ( सौताडा), रविवार दि.२५ रोजी ह.भ.प. रोहिणीताई महाराज परांजपे ( पुणे ), सोमवार दि.२६ रोजी ह.भ.प. सचिन महाराज पवार (पुणे ), मंगळवार दि. २७ रोजी ह.भ.प. अतुल मदाराज शास्त्री ( भगवानबाबा संस्थान तागडगांव ), बुधवार दि. २८ रोजी ह.भ.प. विशाल महाराज खोले ( मुक्ताईनगार, खानदेश ),गुरुवार २९ रोजी हभ.प. अमृताश्रम स्वामी महाराज (नवगण राजुरी ), शुक्रवार शुक्रवार दि. ३० रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील ( भिवंडी, मुंबई ) आदी नामवंत महाराजांची अमृततुल्य अशी किर्तन सेवा होणार असुन शनिवार दि. ३१ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत महंत राधाताई महाराज आईसाहेब यांचे काल्याचे किर्तन होणार आहे , या धार्मिक कार्यक्रमास पाटोदा व परिसरातील भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन महासांगवी, कवडवाडी ग्रामस्थांनी केले आहे.

## युसूफवडगांव जि.प.शाळेमध्ये मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकवाचा कार्यक्रम

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये मकरसंक्रातीच्या निमित्त गावातील माता-भगिनींचा हळदीकुंकवाचा व काही मनोरंजनात्मक खेळ असा दुहेरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ.अश्विनी लामतुरे व शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष सौ.चंद्रकांता निशिगंध तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ.अनुजा लामतुरे,सौ.सुकेशनी थळकरी,सौ.चौधरी मॅडम उपस्थित होत्या या कार्यक्रमासाठी गावातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



हळदीकुंकवाच्या कार्यक्रमानंतर महिलांचा संगीत खुर्ची व बाटलीमध्ये मिरची सोडणे असे मनोरंजनात्मक खेळ आयोजित करण्यात आले होते.त्यातील संगीत खुर्चीमध्ये प्रथम क्रमांक सौ.वर्षा जावळे तर द्वितीय क्रमांक सौ.पुष्पा शिंदे तसेच बाटलीमध्ये मिरची सोडणे या खेळामध्ये सौ.अनुजा लामतुरे तर द्वितीय क्रमांक सौ.सुजाता सावंत यांचे आले.दोन्ही स्पर्धेतील विजेत्यांना कार्यक्रमानंतर शाळेतर्फे तसेच मसाले उद्योजिका सौ.अनुजा महेश लामतुरे यांच्यातर्फे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील श्रीमती.बांगर मॅडम, श्रीमती.पाटील मॅडम, श्रीमती.खरबड मॅडम, श्रीमती. खोबरे मॅडम, श्रीमती.कणसे मॅडम, श्रीमती.काळेबेरे मॅडम या शिक्षिकांनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती.कणसे मॅडम यांनी केले.

## २४ जानेवारी पासून वडवणीत रंगणार वडवणी कीर्तन महोत्सव -ज्ञानेश्वरी प्रवक्ते अर्जुन महाराज खाडे

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील नामांकित ज्ञानेश्वरी प्रवक्ते ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांनी वडवणी शहरात प्रारंभ केलेल्या किर्तन महोत्सवाचे यंदाचे हे तेरावे वर्ष असून यानिमित्त भव्य अशा वडवणी कीर्तन महोत्सवाचे आयोजन वडवणी शहरातील मोठा मारोती मंदिराच्या पाठीमागे स्व.गोपीनाथराव मुंडे चौक बाठिकाणी करण्यात आलेले आहे. याचा प्रारंभ दिनांक २४ जानेवारी २०२६ शनिवार रोजी होणार असून सांगता दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी होणार आहे. तरी वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. आपल्या मधुर बाणीतून संपूर्ण महाराष्ट्रभर ज्ञानेश्वरीचे भावकथा निरुपण करणारे नामांकित प्रवक्ते ह.भ.प.अर्जुन महाराज खाडे यांनी वडवणी शहरात सुरु केलेल्या कीर्तन महोत्सवाचे बावर्षीचे हे तेरावे वर्ष असून प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कीर्तन महोत्सवामध्ये दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते ११ सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण, व रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तन सेवा अशा स्वरुपाचा असणार आहे. दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत ज्ञानेश्वरी पारायण होणार असून याचे नेतृत्व किर्तनकार सौ. गीताताई खाडे-भांगे या करणार आहेत. तसेच गायनाचार्य संजय महाराज देवकर, रमेश महाराज गिन्हे, मुगुट महाराज धायगुडे, मृदंगाचार्य निलेश महाराज खेडकर, सचिन महाराज मुंडे हे यांची साथसांगत लाभणार आहे. तसेच या कीर्तन महोत्सवात दिनांक २४ जानेवारी २०२६ शनिवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प. अशोक महाराज इलग शास्त्री यांची असणार आहे. तर यासाठी सौजन्य बाबुराव बामनराव नागरगोजे यांचे आहे. दिनांक २५ जानेवारी २०२६ रविवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प. धर्मगुरु अमृताश्रम स्वामी यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य समस्त ग्रामस्थ



वडवणी यांचे आहे. दिनांक २६ जानेवारी २०२६ सोमवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य दत्तात्रय आयुचा चोले, दिलीप रघुनाय मुंडे, पोपट पंढरीनाथ जाधवर यांचे आहे. दिनांक २७ जानेवारी २०२६ मंगळवार रोजीची कीर्तन सेबा ह.भ.प. समाधान महाराज भोजेकर यांची असणार आहे तर बासाठी सौजन्य उपनगराध्यक्ष बन्सीधर केशवराव मुंडे यांचे आहे. दिनांक २८ जानेवारी २०२६ बुधवार रोजीची कीर्तन सेबा ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील यांची असणार आहे तरी यासाठी सौजन्य नगरसेवक अरुण सुरेशराव मुंडे यांचे आहे. दिनांक २९ जानेवारी २०२६ गुरुवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगांवकर यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य वैद्यकीय तज्ञ डॉ. पारसमल पन्नालाल नहार यांचे आहे. दिनांक ३० जानेवारी २०२६ शुक्रवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पठाडे यांची असणार आहे तर यासाठी सौजन्य दिलीप मनोहर मुळे यांचे आहे. दिनांक ३१ जानेवारी २०२६ शनिवार रोजीची कीर्तन सेवा ह.भ.प. भगवान महाराज राजपूत मठाधिपती सत्यवादी राजा हरिश्चंद्र संस्थान यांची असून त्यासाठी सौजन्य गोरख अण्णासाहेब मुंडे यांचे असणार आहे. तरी वरील सर्व कीर्तन सेवा ह्या दररोज रात्री ८ ते १० या वेळेत संपन्न होतील. तर दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी ह.भ.प. अर्जुन महाराज खाडे यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होईल यासाठी सौजन्य पांडुरंग हरिभाऊ लांडे यांचे आहे. या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून स्व. हिरालाल पन्नालाल नहार व स्व. सुरजबाई हिरालाल नहार यांच्या पुण्यस्मरणार्थ बडवणी शहरातील प्रसिध्द उद्योजक प्रतिष्ठित व्यापारी माणिकचंद हिरालाल नहार यांजकडून महाप्रसाद संपन्न होईल. हा संपूर्ण कीर्तन महोत्सब बडवणी शहरातील मोठा मारोती मंदिराच्या पाठीमागे लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब चौक येथील मैदानात पार पडणार आहे. तरी बडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या अध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक समस्त ग्रामस्थ बडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. सर्व बडवणीकरांच्या सर्वोतोपरी तन मन धनाच्या सहकार्यातून आजवर हा कार्यक्रम साकारलेला आहे. या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य सर्व पत्रकार बांधव यांचे लाभलेले आहे.

## पान ६ वरुन...

### पो.नि.शरद जोगदंड यांचा

ठरली असून, त्यांच्या या कार्याची वरिष्ठ पातळीवर दखल घेण्यात आली आहे.

शरद जोगदंड यांच्यासह पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ आणि शीतल कुमार बल्लाळ यांच्याही एमपीडीए कार्यवाहीसाठी सत्कार करण्यात आला. तसेच रात्रग्रस्ती दरम्यान चोख कर्तव्य बजावणारे बीड शहराचे पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे, ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब गुंड व त्यांच्या पथकातील अमोलदारांनाही सन्मानित करण्यात आले.

गुन्हेगारांवर जरब बसवण्यासाठी अशा प्रकारच्या कठोर कारवाया सुरूच ठेवाव्यात असे पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी स्पष्ट केले. आढाव बैठकीत वीरेंद्र मिश्रा यांनी अवैध गुटखा विक्री बेकायदेशीर अग्नीशस्त्रे आणि वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्यांविरुद्ध मोहीम तीव्र करण्याचे आदेश दिले. शहरात सुरक्षिततेसाठी जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधण्याच्या सूचना त्यांनी सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

### नागरिकांना त्रासदायक

निवडणूक प्रचार दरम्यान व त्यानंतर नागरिकांनी नगराध्यक्ष ताई बाजीराव धर्माधिकारी यांच्याकडे केल्या होत्या. या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष न करता नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत कारवाईचे तात्काळ आदेश दिले. परिणामी अनेक ठिकाणी अनावश्यक व अनधिकृत गतिरोधक हटवण्यात आले. याचवेळी शहरातील रस्त्यांवरील खड्डे व खराब झालेले पॅचेस भराव टाकून बुजवण्याच्या कामालाही वेग देण्यात आला आहे.अनेक दिवस केवळ फाईलींमध्ये अडकून पडलेली कामे आता प्रत्यक्ष रस्त्यावर दिसू लागली आहेत. पावर हाऊस पासून रस्त्याचे पॅचेस दुरुस्त करून काँक्रिटीकरण करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी, नगरसेवक वैजनाथ सोळंके, जयपाल लाहोटी , राजाखान पठाण, इस्माईल शेख, आनंत इंगळे यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या मागणीनुसार तात्काळ कारवाई झाल्याने व ही कामे सुरू झाल्याने नागरिकात समाधान व्यक्त होत आहे. कोणतीही घोषणा न करता थेट कृतीतून त्यांनी प्रशासनाला कामाला लावले असून नगर परिषदेत शिस्तबद्ध आणि परिणामकारक कारभाराची सुरुवात झाली आहे.मूलभूत नागरी सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत सुरू झालेल्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब

घ्यायचे याचे मार्गदर्शन केले. ही शिकवण आम्हाला बाळासाहेबांकडूनच मिळाली.'' असे गौरवोद्गार त्यांनी काढले.या कार्यक्रमास उपजिल्हाप्रमुख ॲड. नारायण शिंदे, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, शहर प्रमुख मुकेश महाजन युवासेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, युवासेना तालुकाप्रमुख बिभीषण मोघे, शिवसेना नेते विक्रम राजे भोसले, गणेश पवार, तुकाराम उगले, शिवराज उगले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी गणेश पवार यांनी शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना वंदन करून उपस्थितांचे आभार प्रदर्शन केले. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी बाळासाहेबांच्या विचारांवर चालत शिवसेना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### हिंगणी खुर्द जिल्हा

मुंडे, प्रगती तांदळे, सचिता आंधळे, सारिका खेडकर, तेजस्विनी मुंडे, करुणा आंधळे, ज्ञानेश्वरी तांदळे, अनुजा पाळवदे, कल्याणी पाळवदे, वैष्णवी गीते, प्रतीक्षा तांदळे आधी मुली सहभागी होत्या. तसेच लंगडी मध्ये कृष्णा उमेश आंधळे, आदर्श ज्ञानेश्वर आंधळे, जिल्हास्तरावर खेळण्यासाठी निवड झाली आहे. सदरील विद्यार्थ्यांचा सराव करून घेण्यासाठी शाळेतील शिक्षकांनी विशेष परिश्रम करून घेतले आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर आंधळे, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख जे जे शेख सर, माजी सरपंच भागवत आंधळे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष हनुमंत तांदळे, उपाध्यक्ष रवी मुंडे, शिक्षणप्रेमी ज्ञानेश्वर आंधळे, राम आंधळे यांच्यासह शाळेतील शिक्षक भास्कर ढवळे, शैला तांदळे मॅडम, श्रीमती कुलकर्णी मॅडम, श्रीमती धनवे मॅडम आदींसह ग्रामस्थांचे मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं./२०२६**
**भीमा उर्फ भीमराव, काशिनाथ कालुगडे विरुध्द-ग्रामपंचायत कार्यालय, कारेगव्हाण**
**पहा**

१.भीमा उर्फ भीमराव पि.काशिनाथ कालुगडे रा.कारेगव्हाण ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मृत्यु धारक काशिबाई काशिनाथ कालुगडे यांचा दिनांक २४/०७/१९९९ रोजी मृत्यु झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय न..प.कार्यालयास कारेगव्हाण ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्टरला घेवुन जन्म/ मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत मृत्यु कार्यालय मौजे कारेगव्हाण ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २३/०२/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार, बीड**

# कापसाला अखेर सोन्याचा भाव!

## खुल्या बाजारात दर ८ हजारांच्या घरात, यापुढेही दर वाढण्याची शक्यता

परभणी / वृत्तसंस्था

राज्यात सध्या खुल्या बाजारात कापसाच्या दरात चांगली सुधारणा पाहायला मिळत आहे. सध्या कापसाला सरासरी ७,५०० ते ८,००० रुपये प्रति क्विंटल दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. खुल्या बाजारात दर वाढल्याने भारतीय कापूस महामंडळाने (सीसीआय) सुरू केलेल्या कापूस खरेदीला काही प्रमाणात ब्रेक लागला आहे. दरम्यान, यापुढेही दर वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

परभणी आणि हिंगोली या दोन जिल्ह्यांत सीसीआय आणि खासगी व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात कापूस खरेदी झाली आहे. या दोन्ही जिल्ह्यांत मिळून एकूण १२ लाख ५३ हजार ७१५ क्विंटल कापूस खरेदी झाल्याची नोंद आहे. यामध्ये सीसीआयकडून ९ लाख ३८ हजार २२५ क्विंटल, तर खासगी व्यापाऱ्यांकडून ३ लाख १५ हजार २४० क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी आपला कापूस विकल्यामुळे यंदाचा कापूस खरेदी हंगाम लवकरच संपण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

परभणी जिल्ह्यात सीसीआय आणि खासगी व्यापाऱ्यांकडून मिळून ११ लाख १५ हजार ९५ क्विंटल कापूस खरेदी झाला आहे. सीसीआयच्या



केंद्रांवर कापूस विक्रीसाठी परभणी, बोरी, जिंतूर, सेलू, पाथरी, सोनपेठ, गंगाखेड, पालम आणि ताडकळस अशा १० कृषी उत्पन्न बाजार समित्यांतील ७४ हजार ९३२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी ४६ हजार ९०८ शेतकऱ्यांची पडताळणी करून त्यांना कापूस विक्रीसाठी मंजुरी देण्यात आली. जिल्ह्यातील ४६ जिनिंग कारखान्यांमध्ये ८ लाख ६ हजार ४२३ क्विंटल कापूस खरेदी झाला असून, यासाठी शेतकऱ्यांना ७,७१० ते ८,०६० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. तसेच खासगी व्यापाऱ्यांकडून २६ जिनिंग कारखान्यांमध्ये ३ लाख ८ हजार ७२ क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला असून, त्यासाठी ६,७०० ते ८,३०० रुपये प्रति क्विंटल दर देण्यात आला आहे. हिंगोली जिल्ह्यात सीसीआय आणि खासगी व्यापाऱ्यांकडून मिळून १ लाख ३८ हजार ६२० क्विंटल कापूस खरेदी झाला आहे. हिंगोली, आखाडा बाळापूर, वसमत आणि जवळा बाजार या ४ कृषी उत्पन्न बाजार समित्यांतील १३ हजार ४४५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६ हजार ६५९ शेतकऱ्यांची पडताळणी करून कापूस विक्रीस परवानगी देण्यात आली. या जिल्ह्यातील ५ जिनिंग कारखान्यांमध्ये १ लाख ३२ हजार ५२ क्विंटल कापूस खरेदी झाला असून, दर ७,७१२ ते ८,०६० रुपये प्रति क्विंटल इतका मिळाला. खासगी व्यापाऱ्यांकडून ३ जिनिंग कारखान्यांमध्ये ६,५६८ क्विंटल कापूस खरेदी करण्यात आली असून, त्यासाठी ७,२०० ते ८,००० रुपये प्रति क्विंटल दर देण्यात आला आहे.

सीसीआयची १४ केंद्रे कार्यरत

या दोन्ही जिल्ह्यांत सीसीआयच्या १४ केंद्रांवर हमीभावाने कापूस खरेदी सुरू आहे. कपास किसान मोबाइल ॲपद्वारे ८८ हजार ३७७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, त्यापैकी ५३ हजार ५६७ शेतकऱ्यांची पडताळणी पूर्ण झाली आहे. त्यांना केंद्रांवर कापूस विक्रीसाठी मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाच्या सूत्रांनी दिली आहे.

# शासनाकडून सलोखा योजनेला मुदतवाढ

पुणे / प्रतिनिधी

शेतजमिनीच्या ताबा व वहिवाटीवरून निर्माण होणारे वाद ग्रामीण भागातील मोठे सामाजिक आव्हान ठरत आहेत. अशा वादांना सामोपचाराने तोडगा काढण्यासाठी सुरू करण्यात आलेली सलोखा योजना शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे. या योजनेला आता १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

काय आहे सलोखा योजना ? सलोखा योजना ही महसूल विभागाची एक विशेष योजना असून, शेतजमिनीचा प्रत्यक्ष ताबा आणि कागदोपत्री नोंदी यामध्ये तफावत असलेल्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने तोडगा काढण्याची संधी देते. परस्पर संमतीने शेतजमिनीची अदलाबदल करून वहिवाटीचे वाद संपवणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

कोर्टकज्जे, प्रशासकीय विलंबाला फाटा न्यायालयीन प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक असते. सलोखा योजनेमुळे न्यायालयीन लढाया टाळून प्रशासकीय स्तरावरच प्रश्न सुटतात. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि मानसिक ताण वाचतो.

शेतजमीन, वहिवाटीचे वाद सुटणार ग्रामीण भागात पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या वहिवाटीच्या वादांमुळे अनेक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. सलोखा योजनेमुळे प्रत्यक्ष ताब्यात असलेली जमीन कायदेशीर नोंदीत आणण्याची प्रक्रिया सुलभ होते. त्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेले वाद मार्गी लागण्यास मदत होते.

इतके शुल्क भरून जमिनीची अदलाबदल या योजनेअंतर्गत केवळ १ हजार रुपये नोंदणी शुल्क आणि १ हजार रुपये मुद्रांक शुल्क भरून शेतकऱ्यांना आपल्या ताब्यातील शेतजमिनीची अधिकृत अदलाबदल करता येते. कमी खर्चात कायदेशीर तोडगा मिळत असल्याने ही योजना शेतकऱ्यांसाठी किफायतशीर ठरत आहे.

कौटुंबिक वाद, रक्तपाताला बसणार आळा शेतजमिनीवरून होणारे कौटुंबिक वाद अनेकदा टोकाला जातात. काही ठिकाणी हे वाद हिंसक स्वरूप धारण करतात. सलोखा योजनेमुळे सामोपचाराने प्रश्न सुटत असल्याने कौटुंबिक तणाव कमी होऊन सामाजिक सलोखा प्रस्थापित होण्यास मदत होत आहे. योजनेसाठी वादग्रस्त जमीन तसेच प्रत्यक्ष वहिवाट आणि प्रस्तावित अदलाबदल स्पष्ट असणे गरजेचे आहे.

# कोंबड्यातील प्राणघातक 'मानमोडी' आजार : जाणून घ्या उपाय!

कोंबड्यांना होणारा मानमोडी हा संसर्गजन्य आजार असून यामुळे कुक्कुटपालन व्यवसायाचे अर्थशास्त्र कोलमडून पडते. या रोगामध्ये पक्षांच्या मृत्युचे प्रमाण ५० ते १०० टक्के असते. हे नुकसान टाळायचे असल्यास हा रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय करणे गरजेचे असते. यासाठी लसीकरण हा सर्वात चांगला पर्याय आहे. जाणून घेऊया रोगाची लक्षणे आणि यावरील उपाय.

मानमोडी आजाराची कारणे : मानमोडी हा रोग पॅरामिक्सो विषाणूंमुळे होतो. हे विषाणू पक्ष्यांचे श्वसनेंद्रिय, पचनसंस्था, मज्जासंस्था व यकृत यांसारख्या अवयवांवर परिणाम करतात.

या रोगाचा प्रसार हवेद्वारे, आजारी पक्ष्यांच्या विष्ठेद्वारा व श्वसना द्वारे होतो. आजारी पक्ष्यांमुळे पक्षी घरातील वातावरण, उपकरणे व काम करणाऱ्यांच्या कपड्यांवर हे विषाणू मोठ्या प्रमाणात जमा होतात. हे विषाणू वातावरणात बराच वेळ टिकून राहतात. दूषित खाद्य व पाणी, मेलेले पक्षी उघड्यावर टाकणे, लिटर, अंडी उबवणूक यंत्र, इ. पासून या रोगाचा प्रसार होतो. इतर जातींच्या पक्ष्यांना सुद्धा हा रोग होतो व हे पक्षी रोगप्रसारास कारणीभूत ठरतात.



मानमोडी आजाराची लक्षणे :या रोगाची लक्षणे, मृत्यूचे प्रमाण, तीव्रता ही विषाणूंचा प्रकार, पक्ष्यांचे वय, लसीकरण, रोगप्रतिकारक शक्ती, साथ, वातावरण व व्यवस्थापन यावर अवलंबून असतात. मोठ्या पक्ष्यांमध्ये अधिकाधिक पक्षी एका रात्रीत आजारी पडतात. पक्ष्यांना पाण्यासारखी हिरवट रंगाची संडास होते, पंख व पाय अधू होतात. मान वाकडी होते. अंडी देण्याचे प्रमाण घटते. कवच मऊ होते व अंड्याचा आकार बदलतो तसेच पांढरा बलक पाण्यासारखा पातळ होतो. श्वास घेताना मोठा आवाज होतो. तोंडाने श्वासोच्छवास करतात. लहान पिलांमध्ये हा तीव्र स्वरुपाचा आजार असून श्वसनाची व मज्जासंस्थेची लक्षणे दिसून येतात, पिल्ले व तलंग सुस्त व अशक्त दिसतात. पक्ष्यांना चालता येत नाही, थरथर कापतात व लंगडतात. डोळा आणि गळ्याला सुज येते. उपचार : या रोगावर परिणामकारक उपचार उपलब्ध नाहीत; परंतु या रोगानंतर होणार्या जिवाणूजन्य रोगांवर उपचार म्हणून प्रतिजैविकांचा वापर करण्यात येतो. आजारी पक्षी वेगळे काढावे. मृत पक्ष्यांना जाळून टाकावे. दूषित पाणी व खाद्य नष्ट करावे. ऑल इन ऑल आऊट व्यवस्थापन पद्धत राबवावी. शेडचे फ्युमीगेशन (३० मि.लि. फॉर्मेलीन व २० ग्रॅम पोटॅशिअम परमँगनेट) करावे.

लसीकरण : पिल्ले आणल्यानंतर सहाव्या दिवशी लासोटा लस डोळ्यांतून एक थेंब द्यावी व त्यानंतर बूस्टर डोस सहाव्या आठवड्यात पाण्यातून देऊन लसीकरण करावे. अंडी देणाऱ्या पक्ष्यांमध्ये दर सहा आठवड्यांनी पाण्यातून लसीकरण करावे. लस सहाव्या आठवड्यात व बूस्टर डोस १५ व्या आठवड्यात इंजेक्शनद्वारे पंखाखाली द्यावी. पक्ष्यांना लसीकरणापूर्वी दोन ते तीन दिवस आधी पाण्यातून जंतनाशक औषध द्यावे.

# अशी करा शेडनेट हाउस उभारणी

शेडनेट हाउसच्या जागेची निवड आणि उभारणीची दिशा पिकाच्या उत्तम वाढीसाठी आणि संरचनेच्या टिकाऊपणासाठी अत्यंत महत्त्वाची असते. योग्य नियोजन केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होते.शेडनेट हाउसची योग्य दिशा निवडल्याने आत हवा आणि प्रकाशाचे समान वितरण होते, ज्यामुळे पिकांची वाढ चांगली होते. संरक्षित शेती म्हणजे पिकांचे उत्पादन नैसर्गिक प्रतिकूल हवामानापासून संरक्षण देऊन, नियंत्रित वातावरणात घेण्याची आधुनिक शेती पद्धत. या पद्धतीत तापमान, आर्द्रता, प्रकाश, पाणी व खत यांचे नियोजन करता येते. संरक्षित शेती मध्ये पॉलिहाउस, शेडनेट हाउस, लो टनेल, हाय टनेल असे प्रकार वापरून प्रतिकूल हवामानामध्ये भाजीपाला पिकांची योग्य प्रकारे लागवड करू शकतो. शेडनेट हाउसच्या जागेची निवड आणि उभारणीची दिशा पिकाच्या उत्तम वाढीसाठी आणि संरचनेच्या टिकाऊपणासाठी अत्यंत महत्त्वाची असते.योग्य नियोजन केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होते.



जमिनीचा प्रकार : समतल, सुपीक व पाण्याचा निचरा चांगला होणारी जमीन असावी. निचरा व्यवस्थित होत नसेल तर शेडनेट हाउसच्या भोवती पाण्याचा निचरा होण्यासाठी चर काढावेत.चिकणमातीपेक्षा गाळमातीची जमीन योग्य असते. जमिनीत पाणी साचू देऊ नये. ठिबक सिंचनासाठी स्वच्छ व पुरेसा पाण्याचा सततचा पुरवठा उपलब्ध असावा. शेडनेट हाउसपासून पाणी स्रोत जवळ असणे फायदेशीर ठरते. पाणीपुरवठा आणि विद्युत पुरवठ्याची सुविधा जवळपास असावी. पाण्याचा सामू साधारणपणे ६ ते ७.५ च्या दरम्यान असावा. क्षारता कमी असावी. वारंवार तीव्र वाऱ्याच्या क्षेत्रात शेडनेट हाउस उभारू नये.

सूर्यप्रकाश : पिकांना पुरेसा प्रकाश मिळावा. उभारणीसाठी सावलीदार झाडांच्या परिसरातील जागा निवडू नये. जागा भरपूर सूर्यप्रकाश मिळणारी असावी. मोठ्या झाडांची सावली शेडनेट हाउसवर पडणार नाही याची खात्री करावी.

रस्ता, वीज : वाहतुकीसाठी सोईचा रस्ता, वीज व मजुरांची उपलब्धता असणे आवश्यक आहे. जेणेकरून शेतीमाल आणि साहित्य वाहून नेणे सोपे होईल.

दिशा : शेडनेट हाउसची योग्य दिशा निवडल्याने आत हवा आणि प्रकाशाचे समान वितरण होते, ज्यामुळे पिकांची वाढ चांगली होते. भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशांमध्ये उत्तर-दक्षिण दिशा सर्वोत्तम मानली जाते. या दिशेमुळे दिवसभर सूर्यप्रकाश समान प्रमाणात सर्व झाडांवर पडतो. पिकांच्या वाढीसाठी व प्रकाशसंश्लेषणासाठी योग्य वातावरण तयार होते. पूर्व-पश्चिम दिशा ही दिशा फक्त थंड हवामान असलेल्या भागात किंवा उच्च उंचीवरील भागात उपयुक्त ठरते, जिथे सूर्यप्रकाश कमी असतो.

बांधकामाचे नियोजन : बांधकामापूर्वी जमिनीचे समतलीकरण करावे. ठिबक सिंचन प्रणाली आणि प्लॅस्टिक मल्चिंग याचे नियोजन करावे. वाऱ्याच्या दिशेच्या विरुद्ध बाजूला प्रवेशद्वार ठेवावा. शेडनेटची निवड पिकाच्या प्रकारानुसार करावी (उदा. ५० टक्के, ७५ टक्के शेडिंग). स्ट्रक्चर मजबूत ठेवण्यासाठी जीआय पाइप व योग्य फाउंडेशन वापरावे.

शेडनेट टक्केवारीची निवड : पीक व हवामानानुसार नेट निवडणे महत्त्वाचे आहे. ३५ ते ४० टक्के : फुलझाडे, रोपवाटिका ५० टक्के : भाजीपाला (टोमॅटो, मिरची, काकडी) ७५ टक्के : नर्सरी, पालेभाजी यूव्ही स्टेबिलाइज नेट वापरावे.कव्हरिंग आणि फिटिंग : नेट नीट ताणून बसवावे. दोरी, क्लिप्स दर्जेदार असाव्यात. जॉइंट्स मजबूत ठेवावेत. फाटण्याची शक्यता असलेली ठिकाणे संरक्षित करावीत. साइड नेट योग्य उंचीपर्यंत ठेवावे. आवश्यक असल्यास व्हेंटिलेशन नेट, कीटक नियंत्रक नेट वापरावे. उन्हाळ्यात अतिरिक्त सावली किंवा पांढरी शेडनेट वापरावी.

पाणी व सिंचन व्यवस्था : ठिबक सिंचनाचा वापर करावा. पाण्याचा दाब संतुलित असावा. फिल्टर, व्हॉल्व्ह नीट बसवावेत. कीड, रोग नियंत्रण : प्रवेशद्वाराजवळ डबल डोअर पद्धतीचा अवलंब करावा. कीटक नियंत्रक नेटचा वापर करावा. स्वच्छता व निर्जंतुकीकरणाची काळजी घ्यावी. शेडनेटची नियमित तपासणी करावी. तुटलेले/फाटलेले भाग त्वरित दुरुस्त करावेत. पावसाळा व वादळी वाऱ्याआधी विशेष काळजी घ्यावी.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### राष्ट्रीय बालिका दिवस

### महत्वाच्या घटना

१८४८ : कॅलिफोर्निया गोल्डरश कॅलिफोर्नियातील सटर्स मिल येथे एका ओढ्यात जेम्स मार्शल नावाच्या माणसाला मोठ्या प्रमाणात सोने सापडले. या बातमीमुळे जगभरातून लाखो लोक सोने मिळवण्यासाठी कॅलिफोर्नियात दाखल होऊ लागले.

१८५७ : दक्षिण आशियातील पहिल्या विद्यापीठाची कोलकाता येथे स्थापना झाली.

१८६२ : बुखारेस्ट ही रुमानियाची राजधानी करण्यात आली.

१९०१ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला.

१९१६ : नागरी स्वातंत्र्यावर आक्रमण होते या कारणामुळे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने प्राप्तिकर घटनाबाह्य ठरविला.

१९४२ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी बँकॉकवर बॉम्बहल्ला केला. यामुळे थायलँडला इंग्लंड व अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारणे भाग पडले.

१९४३ : पुण्यातील कॅपिटॉल चित्रपटगृहात बॉम्बस्फोट होऊन चार जण ठार

१९६६ : एअर इंडियाचे 'कांचनगंगा' हे विमान युरोपातील आल्प्स पर्वतातील माँट ब्लँक या शिखरावर कोसळले. या अपघातात भारतातील अणूविज्ञानाचे शिल्पकार डॉ. होमी जहांगीर भाभा यांचे निधन झाले.

१९५० : भारताच्या संविधानावर स्वाक्षरी झाली

१९५१ : प्रेम माथुर ह्या देशाच्या पहिल्या महिला पायलट बनल्या.

१९५२ : मुंबई येथे पहिल्यांदा अंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सव साजरा करण्यात आला.

१९६६ : भारताच्या तिसर्या पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी यांचा शपथविधी झाला.

१९७२ : गुआममध्ये इ. स. १९४४ पासून लपलेला जपानी सैनिक, शोइची योकोइ सापडला. त्याला दुसरे महायुद्ध संपलेले माहितीच नव्हते.

१९७६ : 'बर्मा शेल' या ब्रिटिश तेलकंपनीचे राष्ट्रीयीकरण करुन तिचे नाव 'भारत रिफायनरीज' असे ठेवण्यात आले. पुढे १ ऑगस्ट १९७७ रोजी त्या कंपनीचे नाव बदलून 'भारत पेट्रोलियम' असे करण्यात आले.

१९८४ : ॲपल मॅकिन्टॉश कॉम्प्युटर्सची विक्री सुरू झाली.

१९९० : जपान ने पहिला हितेन नावाचा लूनर प्रोब प्रक्षेपित केल्या गेला.

१९९६ : अमेरिकेच्या पहिल्या महिल्या हिलेरी क्लिंटन यांना न्यायालयात हाजीर राहण्यास सांगितले.

२००२ : भारतीय उपग्रह इनसेट-३ आपल्या कक्षेत स्थापित झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२६ : पहिले भारतीय बॅरिस्टर ज्ञानेंद्र मोहन टागोर यांचा जन्म.

१८७७ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक पुलिन बिहारी दास यांचा जन्म.

१९२४ : मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष (मृत्यू: २८ डिसेंबर २००० मुंबई)

१९२४ : रतन साळगावकर ऊर्फ हंसा वाडकर मराठी व हिन्दी चित्रपट अभिनेत्री (सांगत्ये ऐका, लोकशाहीर रामजोशी, विजयाची लग्ने, संतसखू, रामशास्त्री, आजाद, नवजीवन, धन्यवाद, मेरे लाल). 'सांगत्ये ऐका' नावाचे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध आहे. (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७१)

१९४३ : सुभाष घई हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक

१९४५ : भारतीय चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक सुभाष घई यांचा जन्म.

१९४५: भारतीय राजनीती तज्ञ प्रदीप भट्टाचार्य यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९६५ : विन्स्टन चर्चिल दुसर्या महायुद्धकाळातील ब्रिटनचे पंतप्रधान, साहित्यिक, वृत्तपत्रकार, थोर राजकारणी आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: ३० नोव्हेंबर १८७४)

१९६६ : एअर इंडियाचे 'कांचनगंगा' हे विमान युरोपातील आल्प्स पर्वतात कोसळुन भारतीय भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा मृत्यूमुखी पडले. (जन्म: ३० आक्टोबर १९०९)

२००५ : अनुताई लिमये गोवा मुक्तिसंग्राम, संयुक्त महाराष्ट्राचा लढा यात सक्रीय सहभाग घेणार्या स्वातंत्र्यसेनानी आदिवासी महिला व बालकांच्या कल्याणासाठी झटणार्याव सामाजिक कार्यकर्त्या (जन्म:)

२०११ : स्वरभास्कर पण्डित भीमसेन जोशी शास्त्रीय गायक (जन्म: ४ फेब्रुवारी १९२२)

# कोबीवर्गीय पिकांवरील रायसीनेसवर उपाय

कोबीवर्गीय पिकांवरील रायसीनेस म्हणजे फुलकोबी आणि ब्रोकोलीच्या गड्ड्यांमध्ये होणारी एक विकृती आहे, ज्यात गड्डा कडक, कोरडा आणि चवीला कडवट बनतो. हे नेमके कशामुळे होते, यावर उपाय काय करावा, हे समजून घेतल्यास चांगला फायदा होईल. कोबीवर्गीय पिके - रायसीनेस : ही विकृती फुलकोबी आणि ब्रोकोलीवर दिसते. फुलकोबी हे पीक तापमान आणि आर्द्रतेतील चढ-उतारास फारच संवेदनशील आहे. अस्थिर आणि प्रतिकूल तापमानाशिवाय, उच्च आर्द्रता, नत्रयुक्त खताचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केल्याने रायसिनेस होतो. गड्ड्यांची काढणी उशिरा केल्यावरदेखील ही विकृती निर्माण होते. गड्ड्यावर फुलांच्या बारीक कळ्या पसरून मखमलीसारखे आवरण दिसते. फुलकोबीचा पृष्ठभाग एकसमान न दिसता खडबडीत व मोकळा दिसतो. त्यामुळे फुलकोबीच्या गड्ड्याची प्रत खालावते. उपाय : लागवडीच्या ठराविक हंगामासाठी योग्य वाणांची निवड करावी. शुद्ध व खात्रीलायक बियाणे वापरावे. तापमानात जास्त चढ-उतार असणाऱ्या भागात प्रतिकारक जातींची निवड करावी. (उदा. पुसा शुभ्रा, पुसा दीपाली). फुलकोबीच्या गड्ड्याची काढणी योग्य वेळी करावी.

# नपुंसकत्व लपवून मुलाचा थाटामाटात विवाह

## शरीरसंबंध टाळण्यासाठी नवसाचं नाटक; खरं कळताच मुलीच्या पायाखालची वाळू सरकली

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

शहरात एका तरुणीचे आयुष्य उद्ध्वस्त करणारा अत्यंत संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. मुलाचे नपुंसकत्व लपवून थाटामाटात विवाह लावून देत तरुणीची फसवणूक करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. लग्नानंतर पतीने शरीरसंबंध टाळण्यासाठी नवस असल्याचे खोटे कारण पुढे करत विवाहितेला मानसिक त्रास दिला. या बनावामागचे सत्य उघड होताच पीडितेला मोठा धक्का बसला. या प्रकरणात सासरच्या मंडळींनी नाशिकमध्ये फ्लॅट घेण्यासाठी १५ लाख रुपयांची मागणी करत विवाहितेचा छळ केल्याचा आरोप असून, याप्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या एकूण १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ३२ वर्षीय पीडित महिलेचा विवाह २० मे २०२५ रोजी झाला होता. विवाहानंतर पतीने तिच्याशी शरीरसंबंध ठेवण्यास स्पष्ट नकार दिला आणि आपण नवस केला असल्याचे कारण सांगितले. संशय वाढल्यानंतर पीडितेने पतीला वैद्यकीय उपचार घेण्याचा आग्रह धरला असता, तिला मारहाण करण्यात आली. तपासात पुढे आलेल्या माहितीनुसार, पती नपुंसक असून ही बाब लग्नापूर्वीच सासरच्या मंडळींना माहित होती. तरीही ही महत्त्वाची माहिती लपवून तरुणीशी विवाह लावून देण्यात आला, असा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. ही फसवणूक इथेच थांबली नाही. सासरच्या मंडळींनी नाशिकमधील खुटवडनगर परिसरात फ्लॅट खरेदीसाठी १५ लाख रुपयांची मागणी केली. जोपर्यंत माहेरून पैसे येत नाहीत, तोपर्यंत शरीरसंबंध होणार नाहीत, असा जाच विवाहितेला देण्यात आल्याचे तिने तक्रारीत नमूद केले आहे. या काळात सासरच्यांनी तिचे सोन्याचे दागिने तसेच शैक्षणिक कागदपत्रेही बळजबरीने काढून घेतल्याचा आरोप आहे. पीडितेने दिलेल्या तक्रारीत पतीवर आणखी एक खळबळजनक आरोप केला आहे. पतीचे त्याच्या जवळच्या मित्रासोबत समलैंगिक संबंध असल्याचे तिचे म्हणणे आहे. ६ सप्टेंबर २०२५ रोजी तिला अत्यंत क्रूरपणे मारहाण करण्यात आली होती. सततच्या मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून अखेर पीडितेने पोलिसांत धाव घेतली. तिच्या फिर्यादीवरून छावणी पोलिसांनी पती, सासू, दीर, जाऊ, नणंद यांच्यासह एकूण १० जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. २० मे २०२५ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत हा छळ आणि फसवणूक सुरू होती. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# संत रामदास महाविद्यालयास राष्ट्रीय पदवीधर भौतिकशास्त्र परीक्षेचे केंद्र

घनसावंगी। प्रतिनिधी

राष्ट्रीय पदवीधर भौतिकशास्त्र परीक्षा – २०२६ या परीक्षेसाठी केंद्र म्हणून यावर्षी संत रामदास महाविद्यालयाची निवड करण्यात आलेली आहे. या परीक्षेचे केंद्रप्रमुख  यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय पदवीधर भौतिकशास्त्र परीक्षा ही  भारतीय भौतिकशास्त्र शिक्षक संघटना () द्वारे आयोजित केली जाते. ही परीक्षा भौतिकशास्त्रातील पदवीधर विद्यार्थ्यांसाठी असते, ज्यामध्ये उच्च शिक्षणासाठी तसेच संशोधन कार्यासाठी विद्यार्थ्यांची निवड केली जाते. यामध्ये मूलभूत भौतिकशास्त्रातील संकल्पनांवर आधारित प्रश्न विचारले जातात. भौतिकशास्त्रातील हुशार विद्यार्थ्यांना ओळखणे आणि त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा या परीक्षेचा उद्देश आहे.

ही परीक्षा भौतिकशास्त्रातील राष्ट्रीय मानक परीक्षा च्या धर्तीवर घेतली जाते. यामध्ये चांगले प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विविध संधी उपलब्ध होऊ शकतात, कोलकाता येथील एस. एन. बोस नॅशनल सेंटर फॉर बेसिक सायन्सेस एनजीपीईमध्ये टॉपर असलेल्यांना मुलाखतीनंतर त्यांच्या एकात्मिक पीएच.डी. प्रोग्राममध्ये थेट प्रवेश देते.विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र हा विषय करिअर म्हणून घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी अनेक शिष्यवृत्ती  सुरू करण्यात आल्या आहेत. एनजीपीई नंतर एम.एससी. (भौतिकशास्त्र) मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारे या शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत. यामध्ये मूलभूत भौतिकशास्त्राच्या संकल्पना, जसे की यांत्रिकी , विद्युतचुंबकत्व, औष्णिक भौतिकशास्त्र, क्वांटम मेकॅनिक इत्यादींचा समावेश असतो. राष्ट्रीय पदवीधर भौतिकशास्त्र परीक्षा ही भौतिकशास्त्र पदवीधरांसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा आहे, जी त्यांची बौद्धिक क्षमता तपासते. या परीक्षेचे केंद्र छत्रपती संभाजी नगर नंतर या वर्षी संत रामदास महाविद्यालयाला मिळालेले आहे. सदरील परीक्षा दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी १०.००ते १.०० च्या दरम्यान संत रामदास महाविद्यालयांमध्ये आयोजित केली जाणार आहे.

# अंबड पत्रकार संघातर्फे भव्य क्रिकेट स्पर्धा

**अंबड। प्रतिनिधी**

**आचार्य श्री बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर अंबड तालुका पत्रकार संघाच्या वतीने आज शनिवार दि.२४ जानेवारी २०२६ पासून ते सोमवार दि.२६ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत अंबड जालना रोडवरील जयस्वाल ग्राउंडवर (मैदानात) भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान या स्पर्धेतील सामने पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने लॉट्स (चिठ्ठी) काढून निश्चित करण्यात आले असून या टूर्नामेंटमध्ये अंबड शहरातील पोलीस विभाग, पत्रकार संघ, विद्युत महावितरण कंपनी(एम.एस.ई.बी), कृषी विभाग, नगरपालिका व महसूल विभाग अशा एकूण सहा (६) संघांचा सहभाग आहे.**

दरम्यान या सर्व संघांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत लॉट्स काढून कोणत्या संघाची कोणासोबत लढत होणार आहे, हे जाहीर करण्यात आले असून या स्पर्धेची सुरुवात शनिवार दि.२४ जानेवारी२०२६ रोजी अंबड जालना रोडवरील जयस्वाल ग्राउंडवर (मैदानात) सकाळी १०.०० वाजता मान्यवराच्या हस्ते उद्घाटन होऊन पहिला सामना पोलीस विरुद्ध पत्रकार संघात होणारा आहे. दुपारी १.०० वाजता दुसरा (२) रा सामना एम.एस.ई.बी. विरुद्ध कृषी विभाग अंबड यांच्यात होईल तर दुपारी ४.०० वाजता तिसरा (३) रा सामना नगरपालिका अंबड विरुद्ध महसूल विभाग यांच्यात खेळविण्यात येणार आहे. यानंतर दि.२५ जानेवारी २०२६ रोजी पहिल्या तीन सामन्यांतील विजयी तीन संघ निश्चित होतील. चौथ्या संघासाठी या तीन सामन्यांतील पराभूत संघांपैकी एक संघ चिठ्ठीद्वारे निवडण्यात येईल त्यामुळे एका पराभूत संघाला पुन्हा एक सुवर्ण संधी मिळणार असल्यामुळे ही टीम चौथी टीम म्हणून पुढील फेरीत सहभागी होणार आहे. दरम्यान या चार संघांमधील पुढील दोन सामने खेळविण्यात येतील. त्यातून विजयी ठरणाऱ्या दोन (२)संघांमधील अंतिम सामना हा सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे. दरम्यान या स्पर्धेमुळे अंबड तालुक्यातील विविध शासकीय विभाग व पत्रकार संघ यांच्यात आपुलकी, मैत्री व क्रीडावृत्ती वाढीस लागणार असून नागरिकांमध्येही या क्रिकेट स्पर्धेबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

# साठेबाजी करून युरिया जादा दराने विकणाऱ्यांवर कारवाई करा

## शेतकरी हक्क मोर्चाची कृषी अधिकाऱ्यांकडे मागणी

बीड। प्रतिनिधी

शेतकरी अतिवृष्टीने होरपळून निघाला आहे या वर्षी कापूस व सोयाबीन काढून ज्वारी, बाजरी, गहू, भईमुग, घेऊन कुठेतरी आशेचा किरण पाहत असताना व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक युरियाचा साठा करून कृत्रिम तुटवडा निर्माण करत आहेत. तसेच जादा दराने युरियाची विक्री करत असल्याचे दिसून येत आहे याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी कृषी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात शेतकरी हक्क मोर्च्याच्या वतीने करण्यात आली.

युरिया खताची साठेबाजी करून शेतकऱ्यांना २६६ रुपये किमतीचा युरिया ४०० ते ५०० रुपये किमतीने विकला जात आहे, हे दुर्दैवी आहे. युरिया खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्या व चढ्या भावाने युरियाची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनवर तत्काळ कारवाई करण्यात यावी या मागणी करिता शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. युरियाचा साठेबाजी करून कृत्रिम तुटवडा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, जास्तीच्या चढ्या भावाने युरियाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, प्रत्येक व्यापारी व कृषी सेवा केंद्र चालक यांनी उपलब्ध युरिया साठा याचे माहिती फलक लावणे बांधकारक करण्यात यावे, शेतकऱ्यांची अडवणूक करून जास्तीच्या चढ्या भावाने युरियाची विक्री करणाऱ्यांची परवाना तत्काळ रद्द करण्यात यावा यासह आदी  मागण्या शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोकराव येडे, शेतकरी पुत्र बाळासाहेब मोरे, शेतकरी पुत्र अनिल माने, सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजू गायके, अर्जुन सोनवणे यांच्या वतीने करण्यात आल्या आहेत.



# जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक अनुषंगाने  शिवसेनेची बैठक

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जालना येथील शिवसेना कार्यालयात शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत आगामी निवडणुकांसाठी शिवसेनेच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते व इच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन करताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जालना विधानसभा मतदारसंघात आपण केलेली विकासकामे प्रभावीपणे जनतेसमोर मांडावीत. प्रत्येक कार्यकर्त्याने गावोगावी, वाडी-वस्तीवर जाऊन जनतेशी थेट संवाद साधावा, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे आणि नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात.



ते पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या केवळ निवडणुका नसून जनतेचा विश्वास जिंकण्याची संधी आहे. बूथनिहाय नियोजन, संघटनात्मक मजबुती, कार्यकर्त्यांची एकजूट आणि लोकाभिमुख काम हीच शिवसेनेच्या विजयाची खरी ताकद आहे. त्यामुळे प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने जबाबदारीने काम करून शिवसेनेला जिल्ह्यात भक्कम यश मिळवून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीस शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, भाऊसाहेब घुगे, भास्कर मगरे तसेच शिवसेना व युवासेनेचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीमुळे आगामी निवडणुकांसाठी शिवसेनेची तयारी अधिक वेगवान झाली असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# स्वा. सावरकर महाविद्यालयात माता पालक मेळावा संपन्न

बीड। प्रतिनिधी

मकरसंक्रमणाच्या निमित्ताने महाविद्यालयातील शिक्षक पालक योजना कमिटी आणि सखी सावित्री महिला तक्रार निवारण समिती ( महिला कक्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने महिला पालक मेळावा आणि हळदी कुंकू कार्यक्रम २१ जानेवारी रोजी संपन्न झाला. हळदी कुंकू कार्यक्रमाचे निमित्त साधून महाविद्यालयाने महिला पालकांशी पाल्याच्या प्रगती विषयी चर्चा केली. तसेच महिला पालकांमध्ये बॉडी मास इंडेक्स या विषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

यात जमलेल्या महिला पालक तसेच महाविद्यालय परिसरातील महिला यांचा बॉडी मास इंडेक्स प्रत्यक्ष मोजून दाखवण्यात आला. तसेच बॉडी मास इंडेक्स विषयी डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी तयार केलेल्या पावर पॉइंट प्रेझेंटेशनचेही प्रदर्शन करण्यात आले. यावेळी मनोरंजन आणि बॉडी मास इंडेक्स सामान्य ठेवण्यासाठीचा उपाय सुचवण्याच्या हेतूने महिलांची चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत जमलेल्या सर्व महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. यात महिला पालक, परिसरातील महिला आणि संस्थेचे पदाधिकारी अॅड. लोहिया, डॉ.अविनाश देशपांडे, प्रा.चंद्रकांत मुळे सर , उपप्राचार्य लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर सर यांच्या सौभाग्यवतीने सहभाग नोंदवला. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी पालकांशी संवाद साधला.

दिनांक: २३-०१-२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक ईरफान शफीक शेख व आमरीन ईरफान शेख हे आहेत. सय्यद आमेर अब्दुल रहीम वगैरे यांनी खरेदीखत क्र. २९०८/२०१९ दि.१६-०८-२०१९ रोजी प्लॉट क्र.४, शहर भुमापन क्र. ८११८ पैकी, आशाबाई भानुदास शेजाळ वगैरेकडू खरेदी केला व नंतर नाजीया बेगम मिन्हाज पाशा वगैरे यांना सदर प्लॉट क्र. ४, खरेदीखत क्र.४५६८/२०१९ दि.२४-१२-२०१९ रोजी विक्री केला व सदर प्लॉट क्र. ४ बीड नगर परिषद मालमत्ता क्र.३-३-१३०० (नवा), नाजीया बेगम मिन्हाज पाशा शेख कडून ईरफान शफीक शेख व आमरीन ईरफान शेख यांनी खरेदीखत क्र.५५३६/२०२३ दि.०७-१२-२०२३ रोजी खरेदी केला. सद्यस्थितीत सदर मिळकतीचे मालक ईरफान शफीक शेख व आमरीन ईरफान शेख हे आहेत.तथापी, ईरफान शफीक शेख व आमरीन ईरफान शेख यांचेकडून खरेदीखत क्र.२९०८/२०१९ दि.१६-०८-२०१९ हे खरेदीखत मुळ पावतीसह बीड ते बार्शी रोडवर प्रवासा दरम्यान हरवलेले आहे.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले खरेदीखत क्र. २९०८/२०१९ दि.१६-०८-२०१९ मुळ पावतीसह ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील बीड नगर परिषद मालमत्ता क्र.३-३-१३०० (नवा), प्लॉट क्र.४, शहर भुमापन क्र.८११८ पैकी, ज्याची लांबी पुर्व-पश्चिम ४३ फुट, रूंदी दक्षिण-उत्तर ३० फुट, क्षेत्रफळ १२९० चौ. फुट, म्हणजेच ११९.८८ चौ. मी., सर्व्हे नं. १४ बीड तरफ बलगुजार, बीड, ता. जि. बीड, ज्याची चतुः सिमाः-पुर्वेस : स्टार गॅरेजची जागा, पश्चिमेसः रस्ता, दक्षिणेसः प्लॉट क्र.५, उत्तरेस : प्लॉट क्र. ३,

**मिळकतीचे विद्यमान मालक**
**१) ईरफान शफीक शेख व**
**२) आमरीन ईरफान शेख**
**रा.बीड मामला, बार्शी नाका, बीड, ता.जि.बीड,**

**जाहीर नोटीस देणार**
**अॅड. एस. आर. राजपूत,**
**बुंदेलपुरा, बीड, ता.जि. बीड**
**मो. नं.९४२१३४५३४६**

# अहिल्यानगरच्या सीता शेळके यांना 'सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार'

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात शौर्य आणि तांत्रिक कौशल्याचा सुयोग्य वापर करणा-या अहिल्यानगरच्या सुकन्या लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांना भारत सरकारचा मानाचा 'सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून (पराक्रम दिवस)आज केंद्र सरकारने ही घोषणा केली. देशभरातून आलेल्या २७१ नामांकनांतून ले.कर्नल शेळके यांची वैयक्तिक श्रेणीसाठी निवड झाली आहे.

लेफ्टनंट कर्नल सीता शेळके यांनी २०२४ मध्ये केरळमधील वायनाड येथे झालेल्या भीषण भूस्खलनादरम्यान बजावलेली कामगिरी या पुरस्कारासाठी निर्णायक ठरली. जेव्हा वायनाडमध्ये निसर्गाचे थैमान सुरू होते, तेव्हा त्यांनी अत्यंत प्रतिकूल हवामानात शेकडो नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी बचाव मोहिमेचे नेतृत्व केले. त्यांच्या कार्याचा सर्वात मोठा टप्पा म्हणजे चूरलमाला येथील १९० फूट लांबीच्या बेली ब्रिजची विक्रमी वेळेत केलेली उभारणी. या पुलामुळे संपर्क तुटलेल्या दुर्गम गावांशी पुन्हा संवाद प्रस्थापित झाला आणि मदतकार्य पोहोचवणे शक्य झाले. इतकेच नव्हे तर, कोमात्सु २१० एक्सकॅव्हेटरचा कल्पक वापर करून त्यांनी अवघ्या चार तासांत तात्पुरता पादचारी पूल तयार केला होता. त्यांच्या या विलक्षण इंजिनीअरिंग कौशल्यामुळे मदतकार्याला मोठी गती मिळाली. प्रत्यक्ष कार्यासोबतच त्यांनी आतापर्यंत २,३०० हून अधिक जवानांना आपत्ती निवारणाचे विशेष तांत्रिक प्रशिक्षणही दिले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील गाडीलगाव येथील रहिवासी असलेल्या सीता शेळके यांचा लष्करापर्यंतचा प्रवास जिद्दीचा आहे. त्यांचे वडील अशोक भीकाजी शेळके हे पेशाने वकील आहेत. सीता यांनी आपले मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण अहिल्यानगरमधूनच पूर्ण केले. सुरुवातीला पोलीस दलात जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सीता यांनी नंतर देशसेवेसाठी लष्कराची निवड केली.आपल्या मेहनतीच्या जोरावर त्यांनी अत्यंत कठीण समजली जाणारी एसएसबी () परीक्षा उत्तीर्ण केली आणि २०१२ मध्ये चेन्नई येथील ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीतून प्रशिक्षण पूर्ण करून त्या भारतीय लष्करात अधिकारी म्हणून रुजू झाल्या आहेत.

# जिल्हा परिषद प्रशासन अखेर जागे; अतिरिक्त कामकाजाच्या नावाखालील १५० प्रतिनियुक्त्या रद्द

## प्रजासत्ताकदिनी आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल

**बीड। प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात सुरू असलेल्या मनमानी कारभारावर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाला जाग आली असून, अतिरिक्त कामकाज'' या गोंडस नावाखाली करण्यात आलेल्या तब्बल १५० हून अधिक प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रजासत्ताकदिनी ध्वजारोहणासाठी येणाऱ्या पालकमंत्र्यांसमोर लक्षवेधी आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दिल्यानंतर, प्रशासनाने प्रजासत्ताक दिनाच्या आधीच याची दखल घेतली.**



दि. २२ जानेवारी रोजी प्रदीप काकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद बीड यांनी सर्व विभागप्रमुखांना लेखी आदेश देत अतिरिक्त पदभार तात्काळ कमी करून संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी पूर्णवेळ रुजू करून घ्यावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या संदर्भात जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि सामान्य प्रशासन विभागाकडे वारंवार तक्रारी प्राप्त झाल्याचे नमूद करत, दि. २३ जानेवारीपासून संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदस्थापनेवर कार्यमुक्त न केल्यास विभागप्रमुख व सहाय्यक / कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना वैयक्तिक जबाबदार धरले जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. जोपर्यंत अतिरिक्त कामकाज पाहणारा कर्मचारी आपल्या मूळ पदस्थापनेवर रुजू होत नाही, तोपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करू नयेत. डॉ. ढवळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की जिल्हा परिषदेतील कोणत्याही कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक असते. मात्र 'प्रतिनियुक्ती' हा शब्द टाळून 'अतिरिक्त कामकाज'च्या नावाखाली नियमांचा सर्रास भंग करण्यात आला. विशेषतः शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असून, काही विभागप्रमुख सामान्य प्रशासन विभागाला डावलून थेट सीईओ यांच्या नावावर फाईल पाठवत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. सीईओ यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा काही अधिकारी घेत आहेत. १५० पेक्षा अधिक कर्मचारी महत्वाच्या टेबलांवर अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली बसले आहेत. यामागे हितसंबंध व सत्ताधारी गटांचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र


# नाथापूर येथे आरपीआयच्या पदाधिकाऱ्यावर जमावाचा हल्ला

## नाथापूर झाले अशांत गाव, वादाला जातीयवादाची किनार

नाथापूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाथापूर हे दहा पंधरा गावाची बाजारपेठ असलेले गाव. एके काळी शांत व व्यावसायिक असलेले गाव अशी ओळख होती, परंतु मागील काही दिवसापासून हे गाव अशांत झाल्याचे दिसते, दि. २२ रोजी संध्याकाळी येथे दोन गटांतील जुन्या वादाचे रूपांतर गंभीर हिंसक घटनेत झाले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया () चे पिंपळनेर सर्कल प्रमुख सतीश शिनगारे यांच्या घरावर तब्बल ५० ते ६० जणांच्या जमावाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली





आहे.तसें सोशल मीडियावर आलेल्या व्हिडीओ मधून पाहवयास मिळते.

सतीश शिनगारे यांच्या घरावर जोरदार दगडफेक करण्यात आली असून, महिला व लहान मुलांसह कुटुंबीयांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच हल्ल्यावेळी जातीवाचक शिवीगाळ केल्याचेही या व्हिडीओमध्ये एकण्यास येत आहे. हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तींवर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच अनेक सामाजिक कार्यकर्ते जिल्हा रुग्णालय येथे भेटीसाठी आले.यामध्ये किशन तांगडे व इतर आरपीआयचे कार्यकर्ते होते यावेळी त्यांनी पिंपळनेर पोलिसांशी संपर्क साधून दोषींवर तात्काळ कारवाई करून अटक करण्याची मागणी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, नाथापूर येथे मागील काही दिवसापासून अवैध धंद्याचे ऊत आले आहे. मटका, दारू, अवैध गौणखनिज वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे, त्यामुळे गावामध्ये रोज संध्याकाळी कोणाचे ना कोणाचे सतत वाद होतात असे प्रत्येक्ष दर्शी सांगत होते.यातच दोन गटांतून दीर्घकाळापासून वाद सुरू होता. गुरुवारी या वादाने उग्र स्वरूप धारण होऊन हिंसक जमाव सतीश शिनगारे यांच्या निवासस्थानी पोहोचला. जमावाने दगडफेक करत घरात प्रवेश केला आणि कुटुंबीयांवर हल्ला केला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली.

गावात जातीय तणाव पोलिसांनी दक्षता घ्यावी.

सोशल मीडियाच्या व्हिडीओ मध्ये हल्ल्यावेळी जमावाकडून जातीय घोषणाबाजी व अश्लील शिवीगाळ करण्यात आल्याचा आरोप करण्यात आलेला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, दलित समाजातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

कधीही जातीयवादाला थारा न देणारे गावात आज जातीय तणाव असल्याचे समजते.दरम्यान, या घटनेचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, त्यामध्ये जमावाचा आक्रमकपणा स्पष्टपणे दिसून येतो. या प्रकरणाची पिंपळनेर पोलिसांनी तात्काळ माहिती मिळताच गावात तगाडा बंदोबस्त वाढवला व पोलिसांनी प्रकरणाची दखल घेत तपास सुरू केला आहे.अद्यापही अधिकृत गुन्हा नोंद झाला नसल्याचे कळते आहे.

## पो.नि.शरद जोगदंड यांचा विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांच्या हस्ते गौरव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई जिल्ह्यातील गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी एम पी डी ए कायद्याअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांचा विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. बीड जिल्हा पोलीस दलाच्या वार्षिक आढावा बैठकीत शरद जोरदार यांच्यासह उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या इतर पोलीस अधिकाऱ्यांचा ही सन्मान करून त्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.



विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनी बीड जिल्हा पोलीस दलाच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत त्यांनी प्रलंबित गुन्हे, मालमत्ते विरुद्ध चे गुन्हे आणि अवैध धंद्याविरोधात सुरू असलेल्या कारवायांची माहिती घेतली. यावेळी गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढवण्याचे आणि गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्याचे करण्याचे निर्देश त्यांनी दिले. विशेषत: एम पी डी ए अंतर्गत रेकॉर्डवरील गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्याच्या मोहिमेत अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची

पान ३ वर

## मनोज मुळे यांची आयडीएफसी बॅंकेच्या मॅनेजरपदी नियुक्ती

धारुर । प्रतिनिधी

धारुर तालुक्यातील धुनकवाड येथील सुपुत्र मनोज अशोक मुळे यांची आयडीएफसी बॅंकेच्या मॅनेजर पदी नवी मुंबई (नेरुळ) येथे नियुक्ती झाली आहे. या पदासाठी महाराष्ट्रातून केवळ तिघांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये मनोज मुळे यांनी तिसरा क्रमांक पटकावला आहे.

अत्यंत शांत, संयमी स्वभाव आणि हुशार व्यक्तिमत्त्व असलेल्या मनोज मुळे यांनी स्वत:च्या कष्टावर व कर्तृत्वावर हे यश मिळवले आहे. जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही शिखर गाठता येते याचे



ते उत्तम उदाहरण ठरत आहेत.


आपल्या यशामुळे त्यांनी धुनकवाड गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला असून त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मनोज मुळे यांना त्यांच्या पुढील वाटचालीस खूप–खूप शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## आ.धस यांनी घेतले पंढरपूर येथे विठ्ठलाचे दर्शन

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठलरखुमाई यांच्या दर्शनासाठी आमदार सुरेश धस यांनी गुरुवारी श्री क्षेत्र पंढरपूर येथे सदिच्छा भेट दिली. अत्यंत भक्तिभावाने त्यांनी श्री विठुरायाच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेतले. यावेळी मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळाले.

दर्शनानंतर आमदार सुरेश धस यांनी श्री विठ्ठलरखुमाईच्या चरणी राज्यातील सर्व जनतेच्या जीवनात सुख, शांती, समाधान व समृद्धी नांदो, तसेच महाराष्ट्र निरोगी, प्रगत व एकसंध राहो, अशी मनोभावे प्रार्थना केली. सामाजिक सलोखा, अध्यात्मिक ऊर्जा आणि लोककल्याणासाठी ईश्वरकृपा सदैव लाभो, अशीही भावना त्यांनी व्यक्त



केली. या दर्शन सोहळ्यावेळी श्री क्षेत्र तारकेश्वर गड, महिंदा येथील महंत ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत धार्मिक विधी पार पडले. अध्यात्मिक परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करण्यासाठी अशा भेटी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, पंढरपूर हे संत परंपरेचे केंद्र असून श्री विठ्ठलरखुमाईच्या चरणी दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविक येत असतात. आमदार सुरेश धस यांच्या या भेटीमुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. दर्शनानंतर त्यांनी मंदिर प्रशासन, सेवेकरी व भाविकांशी संवाद साधला.

## मकोका गुन्ह्यातील फरार आरोपी सनी आठवले जेरबंद

बीड । प्रतिनिधी

मकोका अंतर्गत दाखल गुन्ह्यात मागील एक वर्षांपासून फरार असलेला सनी उर्फ शनैश्वर शामराव आठवले यास स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या पथकाने पुणे येथून अटक केली आहे. आरोपी दीर्घकाळ पोलिसांना गुंगारा देत होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार आरोपी पुणे परिसरात लपूनछपून राहत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पथकाने सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. अटकेनंतर आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी संबंधित पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

## हिंगणी खुर्द जिल्हा परिषद शाळेचे दोन्ही कबड्डी संघ तालुक्यात प्रथम



चौसाळा । प्रतिनिधी

तालुकास्तरीय घेण्यात आलेल्या मैदानी स्पर्धेत हिंगाणी खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुलांचा कबड्डी व मुलींचा कबड्डी या दोन्ही संघांनी तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच मोठा गट लांब उडी मुलींमध्ये सारिका बाळासाहेब खेडकर हिने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच मोठा गट लांब उडी मुलांमध्ये शुभम वसंत बोराडे यांनी तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. लहान गट लांब उडी मुलांमध्ये कृष्णा उमेश आंधळे याने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल ग्रामस्थांसह जिल्हा परिषद शाळेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.

तालुकास्तरीय मुलांच्या कबड्डी संघात मुले अभिषेक आंधळे, मनोज आंधळे, विवेक आंधळे, शुभम बोराडे, ओम गायकवाड, शुभम आंधळे, सोहम सोनवणे, सार्थक आंधळे, शुभम आंधळे, आदित्य आंधळे, अनुप पवार आदी सहभागी होते. तर मुलींच्या कबड्डी संघात नंदिनी उगलमुगले, ज्ञानेश्वरी

पान ३ वर

## नागरिकांना त्रासदायक ठरणारे अनावश्यक गतिरोधक काढले ; रस्त्यांवरील जोडपट्ट्यातील खड्डे बुजवण्यास सुरुवात

### नगराध्यक्षा पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या लोकाभिमुख कारभाराची चुणूक

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी नगर परिषदेचा कारभार हाती घेताच नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी कोणताही कालापव्यय न करता थेट कामाला सुरुवात केलेली आहे. केवळ आश्वासनांवर नव्हे, तर प्रत्यक्ष निर्णय आणि अंमलबजावणीवर भर दिला आहे. या अनुषंगानेच अनेक लोकाभिमुख कामांपैकी नागरिकांतून मागणी असलेल्या व प्रत्यक्ष नागरिकांचा संबंध येणाऱ्या कामाची तातडीने दखल घेत याबाबतचे कार्यवाही



त्यांनी अतिशय तत्परतेने केली आहे नागरिकांना त्रासदायक ठरणारे शहरातील मुख्य रस्त्यावरील अनावश्यक गतिरोधक हटवणे हटवणे तसेच शहरातील रस्त्यांवर जोड पट्ट्यांच्या ठिकाणी असलेले खड्डे भराव टाकून व्यवस्थित करण्याच्या कामाला सुरुवात झाली असून नागरिकातून समाधान व्यक्त होत आहे.

शहरातील प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांवर नियमांना डावलून त्रासदायक ठरणारे गतिरोधके तयार करण्यात आली होती.या गतिरोधकांमुळे वाहनचालक, रुग्णवाहिका, ज्येष्ठ नागरिक व महिलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. याबाबतच्या सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक तक्रारी व मागण्या

पान ३ वर



बीड : हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या संपर्क कार्यालय येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख संतोष जाधव, उपजिल्हाप्रमुख माऊली खांडे, बीड बाजार समितीचे संचालक दिपक काळे, युवराज लांडे आदीसह मान्यवर उपस्थित होते.

## अपघातात नस तुटलेल्या बोटांची जिल्हा रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया

बीड । प्रतिनिधी

ग्राइंडरमुळे नस तुटलेल्या बोटांवर शस्त्रक्रियाद्वारे जोडविण्यात बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर विजयकट्टे आणि त्यांच्या सहकाऱ्याला यश आले आहे. सदर अवघड शस्त्रक्रिया जिल्हा रुग्णालयात पहिल्यांदाच यशस्वीरित्या करण्यात आली आहे.

या संदर्भात माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील शेतकरी जितेंद्र प्रभू रणदिवे (वय ४०) याच्या हाताची बोटे ग्राइंडरमध्ये अडकल्याने पाचही बोटांच्या नस तुटली. सदर अपघातामुळे रणदिवे यांना माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिला डॉक्टरांनी त्यांना तात्काळ बीड जिल्हा पाठवले. जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक मोहम्मद मुजाहेद यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.विजय कट्टे, डॉ. अनिल भिसे, डॉ. विशाल गायकेयांनी ही अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केली. शस्त्रक्रियानंतर रणदिवे या रुग्णाचे पाचही बोटे हे कार्यान्वित झाले आहेत.

## शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे जयंती यांची उत्साहात साजरी

गेवराई । प्रतिनिधी

आज दिनांक २३ जानेवारी, शुक्रवार रोजी शिवसेना कार्यालय, मोंढा नाका, गेवराई येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात शिवसेना बीड जिल्हाप्रमुख चंद्रकांत आप्पा नवले यांनी उपस्थित शिवसैनिकांना मार्गदर्शन करत शिवसेनेची जडणघडण, पक्षाची वाटचाल व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे



यांनी शिवसेनेसाठी केलेले ऐतिहासिक कार्य याचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बोलताना चंद्रकांत आप्पा नवले म्हणाले की, ‘‘मुंबईला गेल्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांचे दर्शन घेतल्याशिवाय मी कधीही बीड जिल्ह्यात परतलो नाही. बाळासाहेबांमुळेच जिल्ह्यातील असंख्य शिवसैनिकांना कॉलेज, शाळा, माध्यमिक शाळा तसेच विविध संस्था मिळाल्या. शिवसेनाप्रमुखांनी कार्यकर्त्यांना बांधकाम विभाग काय असतो, विश्रामगृह काय असते, तसेच शासकीय अधिकाऱ्यांकडून काम कसे करून

पान ३ वर

## प्रशांत चव्हाण यांना पीएच.डी पदवी प्रदान

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्रबंधक प्रशांत रमेश चव्हाण यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत मॅनेजमेंट सायन्स (व्यवस्थापन शास्त्र) विषयात पी.एच.डी प्रदान करण्यात आली आहे.



प्रशांत चव्हाण यांनी डॉ. विवेक वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली ‘‘अ स्टडी ऑफ कॉटन प्रोडक्शन अॅन्ड मार्केटिंग इन द महाराष्ट्र स्टेट (२००६–२०१६) ‘‘ या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. प्रशांत चव्हाण यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके ,उपाध्यक्ष मा.आ.अमरसिंह पंडित,सरचिटणीस आ.सतीश चव्हाण, यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ऍड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ.जी.के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त १००० ऊसतोड कामगारांना ब्लँकेट वाटप

वडवणी । प्रतिनिधी

दिनांक २३/१/२०२६) वडवणी येथे हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना आणि युवा सेना( शिंदे गट ) यांच्यावतीने वडवणी तालुका शिवसेनेचे तालुका प्रमुख माऊली गोंडे युवा सेनेचे बीड जिल्हा प्रमुख रविराज बडे संदीप माने रामदास ढगे प्रकाश पवार बालासाहेब बादाडे प्रताप मात्रे शिवाजी सावंत बालासाहेब शेंडगे बाळनाथ घाटुळ अशोक राठोड गुलाब राठोड व इतर मान्यवरांच्या हस्ते ऊसतोड कामगारांना १००० ब्लँकेट चे वाटप



सविस्तर वृत्त असे की हिंदुरुदय सम्राट स्वर्गवासी बाळासाहेब ठाकरे यांची आज जयंती या निमित्ताने वडवणी तालुक्यातील ऊसतोड कामगारांना मायेची ऊब मिळावी या उद्देशाने शिवसेना आणि युवासेना वडवणी तालुका यांच्या वतीने सध्या ऊस तोडीवर असलेले ऊसतोड कामगार ऊस तोड करत असलेल्या फडावर जाऊन ऊस तोडणी करणाऱ्या ५० टोळ्यावर प्रत्यक्ष जाऊन १००० कामगारांना थंडीच्या उप देणाऱ्या ब्लँकेट्स वाटप करण्यात आल्या या या आदर्श कार्यामुळे ऊसतोड कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले याप्रसंगी वडवणी शिवसेनेचे तालुकाप्रमुख माऊली गोंडे रविराज बडे रामदास ढगे संदिप माने यांनी ऊसतोड कामगारांची चर्चा करून त्यांचे विविध प्रश्न त्यांचे दुःख दैना जाणून घेतले आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या माध्यमातून सोडविण्याचे आश्वासन दिले याप्रसंगी मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम, मोठ्या संख्येने उपस्थित राहा –सेवलकर

परळी । प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही राणी लक्ष्मीबाई टावर चौक येथे २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७ वाजता भारतमातेचे पूजन व देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे यावेळी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विक्रम चहाचे वितरक संजय सेवलकर यांनी केले आहे.



सूरसंगम ऑर्केस्ट्राच्या वतीने सादर होणाऱ्या या कार्यक्रमात निवेदक व गायक लालाजी के. परळीकर तसेच अमोल तरकसे सर देशभक्तीपर गीतांची सादरीकरण करणार आहेत.

यावेळी लहान मुलांच्या मनोरंजनासाठी तात्या विंचू यांचा कार्यक्रम ठेवण्यात आला असून उपस्थितांसाठी जिलेबी वाटपाचेही आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विक्रम चहा चे वितरक संजय सेवलकर यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे महापालिकेतील कनिष्ठ अभियंता भरती परीक्षा पुन्हा रखडली, २५ जानेवारीला होणारी परीक्षा रद्द

**पुणे । प्रतिनिधी**

**अगोदर लोकसभा नंतर विधानसभा आणि शेवटी महापालिका निवडणुकीसाठीच्या अशा तिन्ही आचारसंहितांचा फटका बसलेल्या महापालिकेतील बहुप्रतिक्षित कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) भरती प्रक्रियेला अखेर नवा मुहूर्त मिळाला होता. नव्या वेळापत्रकानुसार ही परीक्षा आता २५ जानेवारी रोजी ऑनलाइन पद्धतीने होणार होती. मात्र, परीक्षा केंद्रावरून अनेक उमेदवारांनी तक्रारी केल्यामुळे पुन्हा या परीक्षेत विघ्न आले अन् २५ तारखेला होणारी परीक्षाच रद्द करण्यात आली. परीक्षा केंद्रांची निवड, भौगोलिक अंतर, सुविधा आणि पारदर्शकतेअभावी ही परीक्षा अन्यायकारक ठरत असल्याचा आरोप उमेदवारांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका गेटसमोर उमेदवारांनी आंदोलनही केले. परीक्षा केंद्रांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची शहानिशा करून त्यानंतरच नव्या तारखेची घोषणा करण्यात येईल, अशी माहिती महापालिकेचे प्रशासन अधिकारी व उपायुक्त विजयकुमार थोरात यांनी दिली.**



या भरती प्रक्रियेसाठी प्रत्येकी एक हजार रुपये परीक्षा शुल्क भरून सुमारे ४२ हजारांहून अधिक उमेदवारांनी अर्ज केले आहेत. मात्र, हॉल तिकीट मिळाल्यानंतर अनेक उमेदवारांना घरापासून ४०० ते ५०० किलोमीटर अंतरावरील खासगी परीक्षा केंद्रे देण्यात आल्याचे समोर आले. सांगलीतील उमेदवाराला लातूर, लातूरच्या उमेदवाराला कोल्हापूर, नाशिकच्या उमेदवाराला जळगाव, तर कोल्हापूरच्या उमेदवाराला अमरावती येथे परीक्षा केंद्र देण्यात आल्याची उदाहरणे उमेदवारांनी दिली आहेत. परीक्षा केंद्रांची स्थितीही अत्यंत चिंताजनक असल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. गल्लीबोळांतील, टपरीसदृश इमारतींमधील परीक्षा केंद्रे, अपुऱ्या सुविधा, निकृष्ट दर्जाची संगणक व्यवस्था तसेच काही केंद्रांची खराब रेटिंग यामुळे परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेषतः महिला उमेदवारांच्या सुरक्षिततेबाबत तीव्र चिंता व्यक्त केली जात असून, प्रवास, राहण्याची व जेवणाची व्यवस्था यासाठी तीन ते चार हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च येत असल्याचे उमेदवार सांगत आहेत.डिसेंबर महिन्यातच उमेदवारांनी या भरती प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदवले होते. परीक्षा टीसीएस आयऑनसारख्या मान्यताप्राप्त केंद्रांवर दोन ते तीन दिवसांच्या स्लॉटमध्ये घ्यावी, अशी ठोस मागणी करण्यात आली होती. त्या वेळी महापालिका आयुक्तांनीही या मागणीची दखल घेतली होती. मात्र, प्रत्यक्षात परीक्षा अवघ्या सात दिवस आधी हॉल तिकीट देऊन, खासगी केंद्रांवर आणि तेही एकाच दिवशी घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याने उमेदवारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. आता परीक्षा रद्द झाल्याने हजारो उमेदवारांमध्ये पुन्हा एकदा संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, पारदर्शक, सुरक्षित आणि उमेदवाराभिमुख पद्धतीने परीक्षा घेण्याची ठाम मागणी उमेदवारांकडून होत आहे.

दोन वेळा परीक्षा रद्द

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाच्या १६९ जागांसाठी भरती परीक्षा यापूर्वी १ डिसेंबर रोजी होणार होती. पुण्यासह राज्यातील २० शहरात ही परीक्षा घेण्याचे नियोजन केले होते. परंतु, २ डिसेंबर रोजी नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी मतदान होणार होते. त्यामुळे काही उमेदवारांनी ही परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली. त्यामुळे पालिकेने ही परीक्षा पुढे ढकलली. १५ डिसेंबर रोजी महापालिका निवडणुकांसाठीची आचारसंहिता लागू झाल्याने ही परीक्षा आचारसंहितेच्या कचाट्यात सापडली. अखेर १५ जानेवारी रोजी राज्यातील सर्व महापालिकांची निवडणूक झाली. १६ जानेवारी रोजी निकालही जाहीर झाला. त्यामुळे ही परीक्षा २५ जानेवारी रोजी होणार होती. मात्र, काही उमेदवारांनी आंदोलन केल्याने पुन्हा ही परीक्षा रद्द करण्यात आली आहे.

# कॉपी आढळल्यास परीक्षा केंद्राची थेट मान्यता रद्द; दहावी-बारावी परीक्षांपूर्वी राज्य मंडळाचा इशारा

पुणे: राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, बारावीची परीक्षा १० फेबुवारीपासून, तर दहावीची परीक्षा २० फेबुवारीपासून सुरू होणार आहे. यंदा बारावीच्या परीक्षेला सुमारे १५ लाख ३२ हजार, तर दहावीच्या परीक्षेला १६ लाख १४ हजार विद्यार्थी बसणार आहेत. परीक्षेदरम्यान एखाद्या केंद्रावर विद्यार्थी कॉपी करताना किंवा गैरप्रकार करताना आढळल्यास, त्या केंद्राची थेट मान्यता रद्द करण्यात येईल, अशी माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



राज्य मंडळात झालेल्या पत्रकार परिषदेत कुलकर्णी बोलत होते. शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह उपस्थित होते. या परीक्षा पारदर्शक, शिस्तबद्ध आणि पूर्णपणे कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य मंडळाकडून उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बारावीची परीक्षा राज्यातील ३ हजार ३८७ केंद्रांवर, तर दहावीची परीक्षा ५ हजार १११ केंद्रांवर घेतली जाणार आहे. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी राज्यातील सुमारे ८० टक्के परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सर्व संवेदनशील केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ कारवाई करण्यात येईल, असे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. गैरप्रकार करणाऱ्याच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात येणार आहे. गेल्या वर्षीच्या दहावी-बारावीच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार झालेल्या १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता आधीच रद्द करण्यात आली असून, यंदा कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना थारा दिला जाणार नसल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यभर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंतर्गत सध्या जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत असून, विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, नैतिकता आणि परीक्षेचे गांभीर्य रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. शाळा व महाविद्यालयांमध्ये शपथविधी, मार्गदर्शन सत्रे, पालक-विद्यार्थी संवाद कार्यक्रम; तसेच सामाजिक माध्यमांद्वारे जनजागृती केली जात आहे. राज्यस्तरीय समितीसोबतच जिल्हास्तरीय दक्षता समित्या आणि भरारी पथके सक्रिय राहणार असून, ही पथके अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रांची तपासणी करणार आहेत. पोलिस प्रशासन, शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयातून संपूर्ण परीक्षा कालावधीत कडक देखरेख ठेवण्यात येणार आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

# आईच्या डोळ्यासमोरच पोटच्या गोळ्याला चिरडलं

## चार वर्षांचा आर्यन रोड रोलरखाली आला अन् सगळंच संपलं; दौंडमधील हृदयदावक

बारामती । प्रतिनिधी

दौंड तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. दौंड-गोपाळवाडी रस्त्याचे काम सुरू असताना एका चार वर्षाच्या मुलाचा रोड रोलर खाली सापडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. आर्यन जाधव असं या चार वर्षाच्या मुलाचं नाव आहे. .काल गुरुवारी दुपारी सव्वा चार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दौंड शहरात हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. शहरातील जनता कॉलनी भागातील सेंट सेबिस्टियन हायस्कूलच्या मागील दौंड-गोपाळवाडी रस्त्याचे काम सुरू असताना, आर्यन जाधव या चार वर्षाच्या मुलाचा रोड रोलर खाली सापडून चिरडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. काल गुरुवारी दुपारी सव्वा चार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. आईच्या पाठीमागे हा चिमुरडा चालत निघालेला होता, एका सीसीटीव्ही कॅमेरात तो कैद देखील झाला आहे. आईच्या मागे चालत असत[illegible] दरम्यान रॉड रोलर मागे घेणाऱ्या चालकाला अंदाज न आल्याने तो



मुलगा रोलरच्या खाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. आर्यनची आई डांबरीकरणाच्या कामावर मजूर म्हणून काम करत होती. रोड रोलर चालकाचा रोलर फिरवण्याचा वेग जास्त होता लवकर काम उरकण्याच्या नादात त्याच्या रोलर खाली सापडून आर्यन जाधव याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे या प्रकरणानंतर रोड रोलर चालक पळून गेला आहे. या प्रकरणी बांधकाम विभागाकडून रस्ता वाहतुकीसाठी बंद न करता डांबरीकरण सुरू होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने डांबरीकरण करत असताना रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करणे सूचना फलक लावणे, कठडे उभारणे सुरक्षात्मक उपाय करणे या कोणत्या उपयोजना केल्या नाहीत असा आरोप केला जात आहे. दरम्यान, आईच्या डोळ्यादेखतच पोटच्या गोळ्याचा मृत्यू झाल्यानं सर्वच स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. ज्या ठिकाणी अपघात झाला त्याच ठिकाणी आर्यनची आई डांबरीकरणाच्या कामावर मजूर म्हणून काम करत होती. आईच्या पाठीमागे हा चिमुरडा चालत निघालेला होता, एका सीसीटीव्ही कॅमेरात तो कैद देखील झाला आहे. आईच्या मागे चालत असताना याच दरम्यान रॉड रोलर मागे घेणाऱ्या चालकाला अंदाज न आल्याने तो मुलगा रोलरच्या खाली गेला, यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला आहे

# प्रजासत्ताक दिनी सर्व शाळांत सामूहिक कवायत बंधनकारक; सुटी देण्यास मनाई

पुणे: राज्यातील सर्व माध्यमाच्या शासकीय आणि खासगी शाळांना प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलनाचा कार्यक्रम आयोजित करणे अनिवार्य आहे. या उपक्रमात १०० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे उद्दिष्ट असून, शाळांना परस्पर सुटी देता येणार नाही, अशी माहिती शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली.



प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या सामूहिक कवायत संचलन उपक्रमाबाबत राज्य मंडळात झालेल्या पत्रकार परिषदेत सचिंद्र प्रताप सिंह यांनी माहिती दिली. राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी, सचिव डॉ. दीपक माळी, सहसंचालक हारून अतार या वेळी उपस्थित होते. शिक्षण विभागातर्फे यापूर्वी स्वातंत्र्य दिनी देशभक्तीपर गीतांवर कवायत संचलन कार्यक्रम घेण्यात आला होता. त्यानंतर आता प्रजासत्ताक दिनीही हा उपक्रम राबवला जाणार आहे. सिंह म्हणाले, राष्ट्र प्रथम या संकल्पनेवर आधारित असलेली देशभक्तीपर गीतांवरील सामूहिक कवायत शासकीय झेंडावंदन कार्यक्रमानंतर होणार आहे. वीस मिनिटे कालावधीचा हा कार्यक्रम असेल. 'आनंददायी शनिवारी' विद्यार्थ्यांच्या कवायतींचा सराव करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, आरोग्य जागृती, व्यायामासाठी प्रेरित करणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. एनसीसी, स्काऊटच्या विद्यार्थ्यांची कवायतीसाठी मदत घेता येते. कवायतीचा फायदा विद्यार्थ्यांच्या शिक्षणातही होतो. एकाच परिसरात असलेल्या प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी एकत्रितपणे संचलन कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व शासकीय, खासगी शाळांतील २ कोटी १० लाख विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. या दिवशी विद्यार्थ्यांनी गैरहजर न राहता १०० टक्के उपस्थिती राहील याची दक्षता शाळांनी घेतली पाहिजे.

# पत्नीवर चाकूने वार करून पतीने केला खून ; वाडेबोल्हाई येथील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

विभक्त रहात असलेल्या पत्नीला पतीने बोलावून तिच्यावर चाकूने चेहऱ्यावर, गळ्यावर वार करून तिचा खून केल्याची घटना घडली आहे. ही घटना वाडेबोल्हाई येथे जोगेश्वरी हायस्कूलच्या पाठीमागे गुरुवारी (दि.२२) रात्री साडे नऊच्या सुमारास घडली. याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी पतीवर खुनाचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

नम्रता शैलेंद्र व्हटकर असे खून झालेल्या पत्नीचे नाव असून शैलेंद्र प्रकाश व्हटकर (रा. बकोरी) याला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत शाहरुख पठाण (रा. शिरसवडी) याने फिर्याद दिली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शैलेंद्र व नम्रता यांचा दोन वर्षापूर्वी विवाह झाला होता. नम्रता हिचे शाहरुख याच्यासोबतचे प्रेमसंबंध असल्याचे समजल्याने तो वारंवार भांडण करत होता. नम्रता ही दोन महिन्यापूर्वी शाहरुख याच्यासोबत राहण्यास आली होती. नम्रताचे दागिने शैलेंद्र याच्याकडे असल्याने याबाबत चर्चा करण्यासाठी शैलेंद्र याने वाडेबोल्हाई येथे गुरुवारी रात्री नम्रताला बोलावले होते. सव्वा नऊच्या सुमारास शाहरुख व नम्रता दोघेही वाडेबोल्हाई येथे गेले होते. नम्रता व शैलेंद्र दोघे बोलत असताना शाहरुख थोड्या अंतरावर थांबला होता. बोलत असताना शैलेंद्र याने त्याच्याकडील चाकूने नम्रताच्या चेहऱ्यावर, गळ्यावर चाकूने वार केले. ओरडण्याचा आवाज आल्याने शाहरुखने त्याठिकाणी धाव घेऊन वार करीत असताना शैलेंद्र याला ढकलून दिले व आरडाओरडा केला. शैलेंद्र त्याठीकाणाहून चाकू व दुचाकी सोडून पसार झाला. शाहरुखने नम्रताला मित्राच्या मदतीने केसनंद, वाघोली येथील हॉस्पिटलमध्ये नेले होते मात्र डॉक्टरांनी मयत झाल्याचे सांगितले. शैलेंद्र याला अटक करण्यात आली असून २७ जानेवारी पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली असल्याचे पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार यांनी सांगितले.

# विकेंडची गर्दी लक्षात घेऊन पुणे- नागपूर विशेष ट्रेन

पुणे । प्रतिनिधी

पुणे: विकेंडच्या काळात प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी, मध्य रेल्वे पुणे विभागाने पुणे ते नागपूरदरम्यान विशेष शुल्कासह एक विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या रेल्वेमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ट्रेन क्रमांक ०१४६७ / ०१४६८ पुणे-नागपूर-पुणे सुपरफास्ट या दोन्ही विशेष गाड्यांची आठवड्याला प्रत्येकी एक फेरी होणार आहे. तसेच, ट्रेन क्रमांक ०१४६७ पुणे-नागपूर विशेष शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी पुण्यातून दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ६ वाजून ३० मिनिटांनी नागपूर येथे पोहोचेल.

तसेच, ट्रेन क्रमांक ०१४६८ नागपूर-पुणे विशेष शनिवार दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी नागपूर येथून सकाळी ८ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी पुणे येथे पोहोचेल.दरम्यान, ही गाडी उरुळी, दौंड कॉर्ड लाइन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, अंकाई, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा या ठिकाणी थांबे घेईल, या गाडीमध्ये एकूण २० डबे असणार आहेत.२ वातानुकूलित २-टायर, ४ वातानुकूलित ३-टायर, ८ स्लीपर क्लास, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, १ जनरेटर व्हॅन आणि १ गार्ड बेक व्हॅन, अशी डब्यांची संरचना असणार आहे. या सेवेचा प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# प्रेमसंबंधाच्या संशयातून तरुणावर जीवघेणा हल्ला; मुंढव्यात चौघांना अटक

पुणे: विवाहित महिलेसोबत असलेल्या प्रेमसंबंधाच्या संशयातून झालेल्या वादात चौघांनी एका तरुणावर धारधार शस्त्राने वार करून, त्याला झाडाला टांगून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी मुंढवा पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. याबाबत प्रवीण धनंजय माने (वय २४, रा. श्रीमाननगर, शेवाळेवाडी फाटा, मांजरी) यांनी मुंढवा पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. प्रवीण माने हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

तर महेश सोमनाथ सरोदे (वय ३५) त्याचे साथीदार आदित्य शरद भोसले (वय २२), आदित्य संजय रोकडे (वय २१), कैलास संतोष ओव्हाळ (वय २६, रा. सर्व भीमनगर मुंढवा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना मुंढवा येथील भीमनगरमधील बारामती ग्रो चिकन सेंटरसमोर १९ जानेवारी रोजी मध्यरात्री १ वाजता घडली.

याबाबत मुंढवा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्मिता वासनिक यांनी सांगितले की, प्रवीण माने आणि महेश सरोदे हे दोघेही ड्रायव्हर म्हणून काम करतात. प्रवीण माने यांचे एका विवाहित तरुणीबरोबर प्रेमसंबंध आहेत. त्यावरून महेश सरोदे याने मनात राग धरून प्रवीण माने याला फोन करून भीमनगर येथे बोलावून घेतले. प्रवीण माने हा तेथे आल्यावर महेश सरोदे व त्याच्या साथीदारांनी त्यांच्या डोक्यात, उजव्या गुडघ्यावर, दोन्ही हातावर, पाठीवर धारधार हत्याराने वार केले. त्यांचे कपडे पेटवून दिले. तसेच 'तू पोलिसांकडे तक्रार दिली तर तुझी गेम वाजवू,' अशी धमकी देऊन त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक पोलिस आयुक्त अतुलकुमार नवगिरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्मिता वासनिक, सहायक पोलिस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांनी घटनास्थळाला भेट दिली.मुंढवा पोलिसांनी प्रथम महेश सरोदे याला अटक केली. त्याच्याकडे केलेल्या चौकशीतून त्याच्या इतर तीन साथीदारांना अटक केली. सहायक पोलिस निरीक्षक गणेश पिंगुवाले तपास करीत आहेत.

# एमपीएड-एमएड सीईटी २०२६ नोंदणीस १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

पुणे: राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६मध्ये घेतल्या जाणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मास्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (एमपीएड) व मास्टर ऑफ एज्युकेशन (एमएड) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सीईटीची प्रवेश नोंदणी ५ जानेवारी ते २० जानेवारी २०२६ पर्यंत होती. या दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेश नोंदणीस २१ जानेवारीपासून ते १० फेबुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे सीईटी सेलच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

एमपीएड या अभ्यासक्रमास आत्तापर्यंत १ हजार ३८ व एमएड या अभ्यासक्रमास १ हजार २३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. एमपीएड या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २४ मार्च २०२६ रोजी होणार आहे. तर, याची फिल्ड परीक्षा २५ मार्च २०२६ रोजी होणार आहे. एमएड या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २५ मार्च २०२६ रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहितीपुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या ारहरलर्शी.लो या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसाठीची सीईटी परीक्षा महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर संगणकाधारित पद्धतीने ऑनलाइन घेतल्या जातील. मागील वर्षी या दोन प्रवेश परीक्षेमध्ये ६ हजार १९३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

नोंदणीसाठी अपार आयडी व यूडीआयडी बंधनकारक

यावर्षापासून विद्यार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध व्हावी तसेच त्यांची पडताळणी करणे सहजशक्य व्हावे, यासाठी राज्य सामाईक प्रवेश कक्षाने सीईटी प्रवेश परीक्षा नोंदणीसाठी ऑटोमेटेड पर्मनंट कॅडेमिक अकाउंट रजिस्ट्री (अपार) आयडी व दिव्यांग विद्यार्थ्यांना युनिक डिसबिलिटी आयडी (यूडीआयडी) बंधनकारक करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी सीईटीमध्ये नोंदणी करताना अपार आयडी व यूडीआयडीची नोदणी करावी, यावरून विद्यार्थ्यांची पडताळणी केली जाणार आहे. ज्या उमेदवारांनी अद्याप त्यांचा अपार आयडी तयार केलेला नाही त्यांनी तो डिजिलॉकरद्वारे तयार करावा. उमेदवारांनी पुढील अद्ययावत माहिती, तपशीलवार वेळापत्रक आणि परीक्षेशी संबंधित सूचनांसाठी नियमितपणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे.

# पुण्यात तीन नवे सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प सुरू; २६ जानेवारीपासून ट्रायल रन

पुणे । प्रतिनिधी

शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा गाठत वारजे, मुंढवा आणि वडगाव बुद्रुक येथील तीन सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प (एसटीपी) येत्या सोमवार (दि. २६ जानेवारी) पासून सुरू करण्यात येणार आहेत. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून या प्रकल्पांचे उद्घाटन होणार असून, प्रारंभी प्रकल्पांचा ट्रायल रन घेतला जाणार आहे. पुढील तीन ते चार महिन्यांत हे प्रकल्प पूर्णक्षमतेने कार्यरत होतील, अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.

पुणे शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, त्याच प्रमाणात सांडपाण्याचे प्रमाणही वाढले आहे. नदीप्रदूषण रोखणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे तसेच शुद्ध पाण्याचा पुनर्वापर वाढवणे, या उद्देशाने महापालिकेने विविध भागांत सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच भाग म्हणून वारजे, मुंढवा आणि वडगाव बुद्रुक येथील हे तीन प्रकल्प पूर्णत्वास आले आहेत.

मुंढवा येथील एसटीपी प्रकल्पाची क्षमता २० एमएलडी (मिलियन लिटर प्रतिदिन) इतकी आहे. वारजे येथील प्रकल्प २८ एमएलडी, तर वडगाव बुद्रुक येथील प्रकल्पाची क्षमता २६ एमएलडी इतकी आहे. या तिन्ही प्रकल्पांमुळे एकूण ७४ एमएलडी सांडपाणी शुद्धीकरणाची क्षमता पुणे शहराला उपलब्ध होणार आहे. प्रारंभीच्या टप्प्यात प्रकल्पांमध्ये येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया सुरू केली जाईल. यावेळी यंत्रसामग्री, विद्युत व्यवस्था, पाइपलाइन, तसेच संपूर्ण प्रक्रिया प्रणालीची तांत्रिक चाचणी केली जाणार आहे. या कालावधीत आवश्यक त्या सुधारणा व समायोजन करण्यात येतील.

अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले की, २६ जानेवारीपासून तिन्ही प्रकल्पांमध्ये सांडपाणी प्रक्रिया सुरू होईल. सुरुवातीला ट्रायल रन घेतला जाईल. तीन ते चार महिन्यांत सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून हे प्रकल्प शंभर टक्के क्षमतेने कार्यरत केले जातील. हे प्रकल्प जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था (जायका) यांच्या सहकार्याने उभारण्यात आले असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सांडपाणी शुद्धीकरण करण्यात येणार आहे. शुद्ध केलेले पाणी उद्यानांना पाणीपुरवठा, औद्योगिक वापर तसेच काही ठिकाणी पुनर्वापरासाठी वापरण्याचा महापालिकेचा मानस आहे. त्यामुळे स्वच्छ पाण्यावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. शहरातील इतर भागांतही एसटीपी प्रकल्पांची कामे सुरू असून, येत्या काळात पुणे शहर सांडपाणी शुद्धीकरणाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे. नियोजनबद्ध पद्धतीने हे प्रकल्प कार्यान्वित झाल्यास भविष्यातील लोकसंख्या वाढ लक्षात घेता सांडपाणी व्यवस्थापनाची समस्या मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे.